मकरसंक्रांती निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..! –संपादक

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com



बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६३ | मंगळवार, दि.१४ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# कापसाच्या दराने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

## बाजारामुळे शेतकरी मेटाकुटीला; हमीभावापेक्षाही मिळतोय कमी भाव

**पुणे । प्रतिनिधी**

**देशातील बाजारात सध्या कापसाचे भाव दबावातच आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेला पुरवठा आणि कमी मागणी याचा दबाव बाजारावर दिसत आहे. तर देशातील उत्पादन कमी राहूनही बाजारातील आवक आणि कमी मागणी याचा परिणाम दरावर दिसून येत आहे. सोमवारी देशातील बाजारात कापसाला सरासरी ६ हजार ८०० ते ७ हजार २०० रुपयांचा भाव मिळाला.**



देशातील बाजारात कापसाची आवक वाढलेलीच आहे. कापसाची दैनंदीन आवक २ लाख गाठींच्या दरम्यान आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात आवक काहीशी कमी होती. पण नोंव्हेंबरपासून आवक वाढली. तर डिसेंबर महिन्यात आवकेचा दबाव चांगलाच वाढला होता. तर दुसरीकडे आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव कमी असल्याने निर्यात धिमी आहे. तसेच कापूस आयातही होत आहे. त्यामुळे देशातील बाजारात कापसाच्या दरावर दबाव दिसून येत आहे. यंदाच्या हंगामात अगदी सुरुवातीपासूनच कापसाच्या भावावरील दबाव कायम आहे. कापसाचा भाव यंदा हमीभावाच्या पुढे गेलाच नाही. सरकारने यंदा मध्यम ४लांब धाग्याच्या कापसासाठी प्रतिक्विंटल सरासरी ७ हजार १२१ रुपये महीभाव जाहीर केला. तर लांब धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ५२१ रुपये हमीभाव जाहीर केला. पण बाजारात ◀◀ पान २ वर

# ऐन हिवाळ्यात वीजेची मागणी वाढली

## महावितरणकडून विक्रमी २५,८०८ मेगावॅटचा पुरवठा



**मुंबई । प्रतिनिधी**

थंडीमुळे हिवाळ्यात विजेची मागणी कमी होत असली तरी यंदा शनिवारी ११ जानेवारी रोजी राज्यात २५,८०८ मेगावॅट इतकी आतापर्यंतच्या विक्रमी विजेची मागणी नोंदविली गेली व महावितरणने यापूर्वीच नियोजन केल्यानुसार कोणतीही अतिरिक्त वीजखरेदी न करता ही मागणी पूर्ण केली, अशी माहिती महावितरणचे ◀◀ पान २ वर

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठा ट्विस्ट; नवीन एसआयटीची स्थापना

## बसवराज तेलीच राहणार प्रमुख; काहींचा नव्याने समावेश, काहींना वगळले



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे, सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून, एसआयटीची स्थापना ◀◀ पान २ वर

### नवीन एसआयटी

किरण पाटील (अपर पोलीस अधिक्षक,राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, छत्रपती संभाजीनगर), अनिल गुजर (पोलीस उप अधीक्षक राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, बीड), सुभाष मुठे (पोलीस निरीक्षक,राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, बीड), अक्षयकुमार ठिकणे (पोलीस निरीक्षक, भरारी पथक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे), शर्मिला साळुंखे (पोलीस हवालदार भरारी पथक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे), दिपाली पवार (पोलीस हवालदार, सीसीटीएनएस, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे)

# कोणावरही दयामाया दाखवू नका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सीआयडीसह पोलिस अधिक्षकांना फोन



बीड–संतोष देशमुख खून प्रकरण आणि खंडणी प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीचे अधिकारी आणि पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांच्याशी फोनवर चर्चा केली. दोन्ही प्रकरणात कोणावरही दयामाया दाखवू नका, दोषी असलेल्या कोणालाही सोडू नका, असे आदेश फडणवीस यांनी यावेळी दिले.

संतोष देशमुख खून प्रकरणी सुरुवातीपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने घेतले असून अधिवेशनादरम्यान सुध्दा त्यांनी आक्रमक भुमिका घेत कोणालाही सोडणार नसल्याची भुमिका घेतली होती. वाल्मिक कराड यांच्यावर खूनाच्या गुन्ह्यासह मकोका लावण्याची मागणी होऊ लागली आहे. त्यासाठी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी मस्साजोग येथे ◀◀ पान २ वर

# टॉवर आंदोलन मागे; कराडवर मोक्का लावा, अन्यथा सामूहिक आत्मदहन

## मनोज जरांगे, एसपींची मध्यस्थी; वाल्मिक कराड सुटला तर आम्हाला जगू देणार नाही–धनंजय देशमुख



**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सोमवारी मस्साजोग येथील पाण्याच्या टाकीवर चढून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. तपासाची सर्व माहिती आम्हाला देण्यात यावी, यासाठी हे आंदोलन करण्यात आले. दरम्यान मनोज जरांगे आणि पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांच्या मध्यस्थीनंतर चार तासानंतर हे आंदोलन ◀◀ पान २ वर

### ..तर मुंडेंच्या टोळीचे जगणे मुश्किल करेन

#### मनोज जरांगे: मुख्यमंत्री साहेब, तुम्ही अपयशी झालात

बीड : देशमुख कुटुंबियांना धक्का लागला तर आम्हाला सुद्धा मराठे म्हणतात फडणवीस साहेब, देशमुख कुटुंबियातील एकाही ही माणसाच्या जीवाला काही झाले तर धनंजय मुंडे यांच्या टोळीचे जगणे मुश्किल होईल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. तसेच मुख्यमंत्री साहेब, तुमचे पाऊल चुकीचे पडत आहेत, तुम्ही अपयशी झालात, मुख्यमंत्री आरोपी वाचवायला लागले आहेत, अशी आता शंका येते. खंडणीतला आरोपी आहे तो, तुमचे सरकार चालवतो का? असे समजायचे का? असा सवाल यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

### धनंजय देशमुखांवर सदावर्तेंची टिका

धनंजय देशमुख यांच्या या आंदोलनावर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी आक्षेप घेतला आहे. शोले सारखा स्टंटही वास्तविक रियल लाईफमध्ये चालत असतो. आमच्या एसटीमधील एका कष्टकरी टॉवरवर चढला होता तर त्याची नोकरी गेली. त्याला शिक्षा दिली. तर टॉवरवर चढून कायदा–सुव्यवस्थाचा प्रश्न उभा करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत विचार केला पाहिजे, असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले. या प्रकरणात मनोज जरांगे यांच्या भूमिकेवरही सदावर्ते यांनी टीका केली.

### तेव्हापासून ते अस्वस्थ होते–अश्विनी देशमुख

पवनचक्कीतील वादापासून भीती वाटतेय, असं संतोष देशमुख म्हणायचे, असे वक्तव्य संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी केले आहे. भांडणानंतर लातूर गेलो पण सारखे फोन येत असल्याने मस्साजोगला परत आलो, असेही ते मला म्हणाले होते, तेव्हापासून ते अस्वस्थ होते, असे अश्विनी देशमुख म्हणाल्या.

### एसआयटी, सीआयडीकडून देशमुखांना माहिती

संतोष देशमुख खून प्रकरणातील तपासाची पोलिस यंत्रणेकडून आम्हाला माहिती दिली जात नाही, असा आरोप धनंजय देशमुख यांनी करीत पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले होते. याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेत सीआयडी आणि एसआयटीच्या अधिकाऱ्यांना फोन करुन तपासाची माहिती देशमुख कुटुंबाला देण्यात यावी, असे आदेश दिले. त्यानुसार केज येथील शासकीय विश्रामगृहावर धनंजय देशमुख यांना सीआयडीचे अधिकारी सचिन पाटील आणि एसआयटीचे प्रमुख बसवराज तेली यांनी तपासाची माहिती दिली.

### फास्टट्रॅकवर हा खटला चालवला जाणार–शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोपींना फाशी सारखी शिक्षा दिली जावी, अशी न्यायालयात विनंती करणार असल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सीआयडी, एसआयटी लावलेली आहे. यातील एकही आरोपी सुटणार नाहीत. कोणाशीही लागेबांधे असले तरी सरकार कुणाला पाठीशी घालणार नाही, फास्टट्रॅकवर हा खटला चालवला जाणार असल्याचे ते म्हणाले.

### विष्णु चाटेला १८ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी विष्णु चाटे याला केज न्यायालयासमोर हजर केले असता त्यास १८ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | २,६३१ | २,७०० | २,६६५ |
| ज्वारी/हायब्रिड :२०.५० क्विंटल | १,५०० | २,२६६ | १,९८९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २७३.०० क्विंटल | ६,००० | ७,२०० | ७,०२० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: २४.५० क्विंटल | २,५०० | ३,३५३ | २,८७९ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: १९०.०० क्विंटल | ४,०२५ | ४,२०० | ४,१४० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |

# जरांगे समर्थकाकडून लक्ष्मण हाकेंना धमकी



**मुंबई । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांकडून ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना धमकी देण्यात आली आहे. पत्रकार परिषद घेऊन हाके यांनी ही माहिती दिली.**

धमकी आल्याचा व्हिडीओ लक्ष्मण हाके यांनी शेअर केला असून तो सध्या व्हायरल होत आहे. शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये लक्ष्मण हाके हे फोनवर ◀◀ पान २ वर

### भिकार साले–जरांगे

मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांकडून ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना धमकी देण्यात आल्याचा मोठा आरोप त्यांनी केला. हाके यांना आलेल्या धमकीवर मनोज जरांगे पाटील यांनी भाष्य केले आहे. जाय तिकडे.. भिकार साले, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# पंतप्रधान मोदी १५ जानेवारीला महाराष्ट्र दौऱ्यावर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ जानेवारी रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी ते भारतीय नौदलाच्या आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी आणि आयएनएस वाघशीर या नौदल युद्धनौका राष्ट्रार्पण करतील. मुंबईतील नौदल डॉकयार्डमध्ये सकाळी साडेदहाच्या सुमारास या युद्धनौकांचे राष्ट्रसमर्पण पंतप्रधान मोदी करणार आहेत. त्यानंतर ते नवी मुंबईतील खारघर येथील इस्कॉन मंदिराचे उद्घाटन दुपारी साडेतीनच्या सुमारास करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या दौऱ्यात मुंबईमध्येच महायुतीच्या आमदारांसोबत स्नेहभोजन करणार असून, त्यांच्याशी ते संवाद साधणार असल्याचे समजते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक होण्याची शक्यता आहे. यामुळे पंतप्रधान मोदींचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे.






श्री संत वामनभाऊ महाराज

यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञान–यज्ञ महोत्सव

मौजे फुलसांगवी ता. शिरूर कासार जि. बीड

श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते : ह.भ.प.महंत रामेश्वर महाराज शास्त्री

प्रारंभ : दि.१५/१/२०२५ बुधवार पौष वद्य २ द्वितीया

सांगता : दि.२२/१/२०२५ बुधवार पौष वद्य ८ अष्टमी

| वार | तारिख | भागवत कथेतील विषय | कीर्तनकार/ वेळ ८.०० ते १०.०० |
|---|---|---|---|
| बुधवार | १५–१–२०२५ | भागवत महात्म्य | श्री.ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली बोगीर (नाशिक) |
| गुरूवार | १६–१–२०२५ | परिक्षिती चरित्र | श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे (श्री रत्नेश्वर संस्थान टोकवाडी, परळी) |
| शुक्रवार | १७–१–२०२५ | कपील चरित्र, नृसिंह अवतार, ध्रुव महात्म्य | श्री.ह.भ.प. महादेव महाराज राऊत (म्हाळस जवळा) |
| शनिवार | १८–१–२०२५ | भरत चरित्र, अजामेळ कथा, प्रल्हाद चरित्र | श्री.ह.भ.प. सुधाकर महाराज वाघ (पैठण) |
| रविवार | १९–१–२०२५ | बळीराजा, गजेंद्र कथा, कृष्णावतार | श्री.ह.भ.प. रविदास महाराज सिरसाट (आळंदी) |
| सोमवार | २०–१–२०२५ | कृष्णलिला, रुक्मिणी स्वयंवर | श्री.ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी (पैठण) |
| मंगळवार | २१–१–२०२५ | सुदामा कथा, परिक्षिती मोक्ष | श्री.ह.भ.प. प्रभाकर महाराज बोधले (संत मानकोजी महाराज बोधले यांचे १० वे वंशज) |

श्री.ह.भ.प.स्वामी जनार्दन महाराज गुरु निगमानंद महाराज मत्सेंद्रगडकर यांचे बुधवार दि.२२/०१/२०२५ रोजी दु.१२ ते २ अमृततूल्य काल्याचे किर्तन होईल.

: आपले विनीत ::

समस्त गावकरी मंडळी व श्री संत वामनभाऊ महाराष्ट्र विश्वस्त मंडळ

मौजे फुलसांगवी, ता.शिरुर (का.), जि.बीड

## अग्रलेख

# ‘मविआ’त वादाची ठिणगी

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आता महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडली आहे. त्यामुळे आघाडीतील तीनही पक्षांत सारे काही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटावर तोंडसुख घेतल्यानंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही महाविकास आघाडीला घरचा आहेर दिला आहे. वडेट्टीवार यांच्या टीकेनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

आघाडीतील तिन्ही पक्षांचे लक्ष आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर आहे. परंतु सध्याच्या सैरभैर स्थितीत त्यांना यश मिळेल की नाही ते सांगणे कठीण आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीत अमाप यश मिळालेल्या महाविकास आघाडीची विधानसभा निवडणुकीत मात्र ससेहोलपट झाली. त्यानंतर आता आघाडीत सारेच पक्ष ‘एकला चलो रे’चे सूर आळवताना दिसत आहेत. त्यामुळे आघाडीत फूट अटळ असल्याचे बोलले जात आहे. महानगरपालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर असताना महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून एकमेकांवर चिखलफेक सुरू आहे. ही चिखलफेक स्वबळावर निवडणूक लढवण्यासाठीच सुरू असल्याचे बोलले जात आहे. विधानसभा निकालानंतर आघाडीची एकही बैठक झाली नाही. त्यामुळेच आघाडीत बिघाडीचे संकेत दिसून येत आहेत. आघाडीच्या जागावाटपाचा किंवा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याचा विषय असू द्या, विधानसभा निवडणुकांच्या बैठकांमध्ये कधीच एकमत झाले नाही. त्यामुळे पक्षांना आणि संभाव्य उमेदवारांना तयारी करण्यास पुरेसा वेळच मिळाला नाही. निकालानंतर आत्मपरीक्षण करण्यासाठी एकही संयुक्त बैठक घेण्यात आली नाही. प्रत्येक पक्ष आपले वैयक्तिक चिंतन आणि बैठक घेण्यात मग्न आहे. ठाकरेंची शिवसेना आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याच्या मूडमध्ये आहे. यामुळे महाविकास आघाडीची एकजूट आणि समन्वय निकालानंतर दिसलाच नाही.

एकमेकांच्या चुका आता जाहीरपणे बोलून दाखवण्याची जणू काही स्पर्धाच सुरू झाली आहे. ज्यांनी आघाडीची मूठ बांधली, वज्रमूठ घट्ट केली ते राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारही नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या राष्ट्रवादीतही दुहीची बीजे पेरली जात आहेत. काही कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना हटवून मराठेतर नेत्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोपविण्याची मागणी केली आहे म्हणे. लोकसभेतील घवघवीत यशानंतर विधानसभा म्हणजे हातचा मळ आहे असा समज करून घेत आपण गाफील राहिलो, त्याची किंमत मोजावी लागली. आता गाफील राहू नका असे आवाहन शरद पवारांनी कार्यकर्त्यांना केले आहे. राष्ट्रीय स्तरावरही इंडिया आघाडीत फूट दिसून येत आहे. इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीचे तीन तेरा वाजणार नाहीत याची काळजी घेण्याची वेळ आली आहे.

## सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्यासाठी फडणवीसांचा केंद्रीय कृषीमंत्र्यांना फोन

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना केली आहे. फडणवीस यांनी मंत्री चौहन यांच्याशी फोनवरुन चर्चा केली. सोयाबीन खरेदीला किमान १५ दिवस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आता त्यांच्या या मागणीवर कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**



दरवर्षी पणन विभागामार्फत सोयाबीनची खरेदी केली जाते. ही खरेदी कोणत्याही अडथळ्याशिवाय होण्यासाठी विभागाने कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे सोमवारी पणन विभागाकडून १०० दिवसात करण्यात येणाऱ्या कामाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. पुढील वर्षीपासून राज्यात नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठीची तयारी ऑक्टोबरमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना देऊन देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांची नोंदणीही ऑक्टोबरमध्ये पूर्ण करावी. सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावे. त्यामध्ये सर्व सोयी सुविधांचा अंतर्भाव असावा. कोणत्याही अडचणीशिवाय सोयाबीन खरेदी सुरू राहिली पाहिजे, अशी यंत्रणा उभी करावी. राज्यातील चारही विभागात उभारण्यात येणाऱ्या ॲग्रो लोगिस्टीक हबचा प्रस्ताव सादर करावा. कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळ हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी जास्त मागणीही आहे. त्यामुळे या चाळींची संख्या वाढवावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

## आर.एन.डी. विद्यालयातून विद्यार्थ्यांना मिळते भविष्याची शिदोरी –सागर धस

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील मुगगांवच्या राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर.एन.डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालय मुगगांव येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते रांगोळी वकृत्व स्पर्धा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान देखील या ठिकाणी करण्यात आला त्याचबरोबर शिवव्याख्याते गणेश भोसले यांच्या शिवव्याख्यानाच देखील आयोजन करण्यात आले होते.**

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर. एन. डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालय मुगगांव मध्ये दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव आयोजित केला जातो यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी उपक्रम आयोजित करून त्या ठिकाणी त्यांचा सन्मान केला जातो विविध स्पर्धेचे आयोजन यावर्षी करण्यात आले होते रांगोळी स्पर्धा वकृत्व स्पर्धा तसेच जिल्हा राज्यस्तरीय खेळांमधून पुढे गेलेल्या विद्यार्थ्यांचा या ठिकाणी सन्मान करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे सागर धस यांनी विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावं यासाठी सर्व गोष्टी परिपूर्ण करण्यासाठी संस्थेला योग्य मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांनाही पुढील योग्य दिशा देण्यासाठी बळ मिळावं असे मार्गदर्शन केले तसेच शिवव्याख्याते गणेश भोसले यांनी त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे मार्गदर्शक तत्वे सांगितले आणि जगण्याचा मंत्र सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्याचे काम केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय खोटे यांनी संस्थेविषयी आणि भविष्यातील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना मोठ्या पदावर घेऊन जाण्यासाठी आम्ही त्यांना योग्य ते शिक्षण देण्याचा प्रयत्न करू असेही सांगितले तसेच पत्रकार प्राध्यापक सचिन पवार यांनी देखील मनोगत व्यक्त करताना महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत आणि त्यांचा इतिहास वाचताना त्यांचे विचार घेताना त्यांनी केलेला संघर्ष हा डोळ्यासमोर ठेवून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करत रहावे असे सांगितले त्याचबरोबर अनेक मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते सागर आप्पा धस, युवा उद्योजक महेश दादा हंबर्डे, माऊली आप्पा जरांगे, गोवर्धन सुळे कांतीलाल गिरी तर एक क्रमाचे अध्यक्ष म्हणून राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर एन डी उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मुगगांवचे माजी सरपंच संजयजी खोटे हे होते. तरी या कार्यक्रमासाठी रघुनाथ सुळे चेअरमन निवडुंगा, भीमराव सरोदे सर, प्राचार्य भवर सर, मुख्याध्यापक येटकळ सर, शिरसाट सर, कापसे सर, गिरी सर, प्राध्यापक अशोक पवार सर, लगड सर साळुंखे सर कटके सर, प्राध्यापक सचिन पवार, तांबारे सर, प्राध्यापक गजधने, प्राध्यापक महादेव वराड, प्राध्यापक माणिक वराड, इंगळे, शेषराव सुळे, त्रिंबक गाडे, नितीन थोरात यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले प्रस्ताविक भवर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खोटे सर यांनी केले. स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगांव चे लालासाहेब गोपाळराव वीर सर यांची सेवापूर्ती पूर्ण झाल्याने त्यांचा कार्यक्रम जिजाऊ जयंती निमित्त आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांनी केलेल्या तीस वर्षाच्या सेवेवर प्रकाश टाकताना मान्यवरांनी त्यांच्या कामाचं कौतुक केलं. एक सर्वसामान्य व्यक्ती काय करू शकतो हे संजय खोटे यांच्याकडे पाहिल्यानंतर लक्षात येतं सामाजिक क्षेत्रात चळवळ करत असताना स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात शिपाई म्हणून काम करताना मनात संकल्पना आली आणि विद्यालय स्थापन केलं फक्त एवढंच म्हटलं तर विषय संपेल पण त्यांनी केलेला संघर्ष त्यांच्यातील जिद्द चिकाटी त्यातून उभा राहिलेलं आर्यन टी विद्यालय हे आज नावारूपाला आला आहे. विद्यालयातून अनेक विद्यार्थी घडले मोठ्या पदावर गेले विद्यालयाचे नाव मोठं होत गेलं आज विद्यालय पाटोदा तालुक्यात नावा रुपाला आल आहे त्याला एकमेव कारण ठरलं ते म्हणजेच संजय खोटे यांची जिद्द-चिकाटी आणि संघर्ष खरच त्यांच कौतुक करायलाच हवं. स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुगगाव चे सेवानिवृत्त शिक्षक लालासाहेब गोपाळराव वीर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमांमध्ये बोलताना सागर धस यांनी त्यांच्या तीस वर्षाच्या कार्यकाळाचा लेखाजोखा मांडला आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केलं भविष्यामध्ये त्यांनी आता स्वत:चं आयुष्य जगावं असं ही त्यांनी या ठिकाणी नमूद केले.

## भारत सरकार नोटरीपदी ॲड.हंबर्डे यांची निवड


**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय आष्टी येथील प्रसिद्ध ज्येष्ठविधीज्ञ ॲड राकेश हंबर्डे यांची भारत सर कार नोटरीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी निवड झाल्याचे प्रमाणपत्र देखील मिळाले आहे.**



केंद्र सरकारच्या वतीने जाहीर क रण्यात आलेल्या यादीनुसार विवि ध ठिकाणचे नोटरी पदे जाहीर करण्यात आली असून यामध्ये आष्टी तालुका वकील संघाचे माजी उपाध्यक्ष तथा नगरपंचायत कायदे विषय सल्लागार ज्येष्ठ विधीज्ञ राकेश हंबर्डे यांचे नाव प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर दि.११ जानेवारी २०२५ ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी म्हणून प्रमाणपत्रवाटप करण्यात आले असुन त्यामध्ये २५ वर्षापासुन वकीली करणारे आष्टी न्यायालयातील प्रसिद्ध जेष्ठ विधीज्ञ ॲड राकेश हंबर्डे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे आ सुरेश धस, माजी साहेबराव दरेकर, किशोर हंबर्डे, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष ॲड अजय जेवे, उपाध्यक्ष ॲड किशोर निकाळजे, सचिव ॲड यासिर सय्यद, ॲड अविनाश निंबाळकर,ॲड आजिनाथ पोकळे,मोहन झांबरे, सरपंच मनोज थोरवे,किरण पोकळे, युवराज मुटकुळे सह अन्य मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## भोगी अन् संक्रांत...!



**भोगी हा सण पूर्णत: माता शाकंबरी तिच्या स्मरणार्थ कृतज्ञता म्हणून केला जाणारा सण आहे. शाकंबरी हिने संपूर्ण भारतभर प्रवास करून भाज्या आणि फळांचा शोध लावला. भाज्या आणि फळांचा शोध लावणारी ती मातृदेवता आहे. शाकंबरी या तिच्या नावावरूनच शाक भाजी नावाचा प्रकार महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. ज्यात सर्व प्रकारच्या भाज्या एकत्र करून केले जाते, त्याला शाक भाजी असे म्हणतात. पूर्वीच्या काळी लग्नकार्यात ही भाजी अतिशय चवीने लोक खायचे. आज सुद्धा अनेक ठिकाणी ती खायला मिळते व या सणाच्या निमित्ताने घरोघरी होत असते.**

विविध भाज्यांचे संशोधन करून त्या भाज्या माणसाच्या खाण्याच्या योग्यतेच्या आहेत की नाही हे पाहण्याचं काम शाकंबरी आणि तिच्या संपूर्ण गणाने केलेले आहे. विविध भाज्यांचा आणि फळांचा शोध तिने लावलेला आहे. एकाच वेळेस अनेक भाज्या ज्यावेळी गणांनी समोर आणून ठेवल्या त्यावेळी सगळ्या भाज्या एकत्र शिजवल्या गेल्या तेंव्हा ही शाक भाजी झाली. ज्यावेळेस तिच्यावर प्रयोग केला गेला, टेस्ट केली गेली, त्याला वेळ दिला गेला, त्यावेळेस त्या भाजी खाण्यास काही हरकत नसल्याचे सांगितले. माणसाला आरोग्याला उपयोगी पडणारी फळे आणि भाज्या शोधण्यासाठी तिच्या अनेक गणांनी खूप मोठा त्याग केलेला आहे. ज्या भाज्या माणसाच्या खाण्या लायक नाहीत, अशा भाज्या खाऊन तिचे अनेक गण मृत्युमुखी पडलेले आहेत. ज्या भाज्या चांगल्या आहेत त्याच्यावर प्रयोग करून त्यांनी नंतर त्या माणसांना खाण्यासाठी पुढे आणलेल्या आहेत. ज्या ठिकाणी दुष्काळ आहे, संकट आहे अशा भागात ती भाज्या आणि फळे घेऊन जायची त्यामुळे संक्रांत आली हा वाक्प्रचार प्रसिध्द झाला. संक्रांत हा शब्द त्या काळात ‘‘सुबत्ता येणे‘‘ अशा अर्थाने वापरला जायचा परंतु पुढील काळात संक्रांत येणे म्हणजे एखादे अरिष्ट येणे, संकट येणे अशा चुकीच्या अर्थाने वापरून बदनाम केले गेले. संक्रांत येणे म्हणजे अरिष्ट येणे नव्हे तर सुबत्ता येणे, संकट जाणे हा अर्थ आपण शाकंबरीच्या या त्यागातून आणि कामातून घेतला पाहिजे आणि भोगी म्हणजे भोगणे या वाईट अर्थाने नाही तर आस्वाद घेण्यास मिळणे या सकारात्मक अर्थाने त्याचा अर्थ घ्यावा. जिने तुम्हा आम्हाला जगायला शिकवले, आरोग्यदायी बनवले, शाक भाजी आणि फळे भाज्या दिल्या, त्या मातेचा सण म्हणजे भोगी आणि संक्रांत त्यानिमित्ताने सर्वांना शुभेच्छा..!!

**साभार राहुल पोकळे**

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी पुण्यासह ५ शहरात उत्कृष्ठता केंद्राची घोषणा

### मुख्यमंत्र्यांकडून महाज्योतीचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे कोचिंग आणि फेलोशीपसारख्या योजना राबविण्यात येतात. महाज्योती या संस्थेमार्फत पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये उत्कृष्ठता केंद्र स्थापन करण्यात येणार असून, या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे राज्यातील इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. पुण्यासह इतर विभागीय क्षेत्रातील शहरांच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हे केंद्र सोयीचे होईल. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक गुणवत्तेचे शिक्षण डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल क्लास रूम प्रकल्प राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या धर्तीवर विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता सीड अंतर्गत घरकुले बांधण्यासाठी योजना राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत एकूण १८ महामंडळे स्थापन करण्यात आली असून या महामंडळांच्या लाभार्थ्यांकरीता वेब पोर्टलची निर्मिती तात्काळ करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची कर्ज मर्यादा वाढविण्याबाबतही प्रस्ताव तयार करून मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात यावा. इतर मागास प्रर्वगातील मुला-मुलींसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे सुरु करण्याबाबत जागा उपलब्ध होण्याबाबत मुख्य सचिव यांच्याकडे संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक घेण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांच्यासह विविध विभागांचे प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव, सचिव उपस्थित होते.

## अर्चना कुटेंसह सर्व मल्टिस्टेटच्या आरोपींना फरार घोषीत करा-प्रा.सचिन उबाळे

### महिनाअखेरीपर्यंत एमपीआयडीचा प्रस्ताव पाठविणार-गोल्डे

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांच्या तपासाबाबत पोलिस अधीक्षक कार्यालयात सोमवारी (दि.१३) पोलिस उपअधीक्षक तथा तपास अधिकारी विश्वांभर गोल्डे यांच्या उपस्थितीत ठेवीदार कृती समितीची बैठक पार पडली. यावेळी अर्चना कुटेंसह दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमधील अद्याप अटक न झालेल्या सर्व आरोपींना फरार घोषीत करा अशी मागणी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी केली. दरम्यान मल्टिस्टेट, पतसंस्थांमधील सर्व आरोपींविरोधात महिना अखेरीस एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पाठिवणार असल्याची माहिती पोलिस उपअधीक्षक तथा तपास अधिकारी विश्वांभर गोल्डे यांनी बैठकीत दिली.**



बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, साईराम मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, जिजाऊ मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, शुभ कल्याण मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी या (मल्टीस्टेट) को. ऑपरेटीव्ह सोसायटी या दिवाळखोरीत निघाल्या असून जिल्ह्यातील ठेवीदारांचे लाखो रुपये यामध्ये अडकले आहेत. या प्रकरणी स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी ठेवीदारांच्या बाजूने आवाज उठवत उपोषण, आंदोलने करुन हे प्रकरण लावून धरले. यामुळे जिल्हाप्रशासन व पोलिस प्रशासनाने सुरेश कुटे, साईनाथ परभणे, यशवंत कुलकर्णी, बियाणी, यासह काही पतसंस्थांच्या संचालकांना अटक केली. मात्र अजुनही काही आरोपी फरार आहेत. दरम्यान चार दिवसांपूर्वी प्रा.सचिन उबाळे यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन मल्टिस्टेट, पतसंस्थांच्या तपासाबाबत माहिती देण्याची मागणी केली होती. यानंतर पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी सोमवारी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. सोमवारी (दि.१३) पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस उपअधीक्षक तथा तपास अधिकारी विश्वांभर गोल्डे यांच्या उपस्थिती ठेवीदार कृती समितीची बैठक झाली. या बैठकीत ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी अर्चना कुटेंसह दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमधील अद्याप अटक न झालेल्या सर्व आरोपींना फरार घोषीत करा अशी मागणी केली. तसेच फरार आरोपींना लवकरात लवकर अटक न केल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा प्रा.सचिन उबाळे यांनी केली. यावेळी तपास अधिकारी विश्वांभर गोल्डे यांनी तपासाबाबत सविस्तर माहिती देत सर्व आरोपिंविरोधात महिनाअखेरीस एमपीआयडीचा प्रस्ताव दाखल करण्यात येणार असल्याचे गोल्डे यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### कापसाच्या दराने शेतकऱ्यांचे

यंदा ७ हजार ५०० च्या पुढे भाव गेला नाही. शेतकऱ्यांना हंगामाच्या सुरुवातीपासूनच ६ हजार ५०० ते ७ हजार २०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला होता. कापसाचा भाव दबावात असल्याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसला. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव दबावात आहेत. भारतात कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क लागू आहे. असे असातानाही काही प्रमाणात कापासाची आवक सुरु आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील मंदीचा दबाव देशातही दिसून येत आहे. अमेरिकेचा वायदे बाजार ६७ सेंट प्रतिपाऊंडच्या दरम्यान दिसत आहे. तर कॉटलूक ए इंडेक्स ७८ सेंट प्रतिपाऊंडच्या दरम्यान दिसत आहे. तर भारताचा कापूस यापेक्षा जास्त पडतो. यामुळे निर्यातीवर काही मर्यादा येत आहे. भारताच्या कापसाचा मोठा ग्राहक बांगलादेश आहे. परंतु बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीचा फटका येथील कापड उद्योगाला बसत आहे. त्यामुळे निर्यात कमी झाली. तर पाकिस्तानला विदेशी चलनाची टंचाई भासत आहे. चीनकडूनही अपेक्षित असा उठाव सध्या नाही. याचा परिणाम कापसाच्या भावावर दिसत आहे. पण पुढील काही आठवड्यांमध्ये या सर्व आघाड्यांवर सकारात्मक घडामोडी घडण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे कापसाला उठाव मिळू शकतो, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

-------

### ऐन हिवाळ्यात

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महावितरणने वाढत्या वीज मागणीनुसार पुरवठ्याचा आराखडा तयार केला आहे. त्यामुळे उच्चांकी मागणीनुसार महावितरणला वीज पुरवठा करता आला. महावितरणकडे मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यातील वीज पुरवठ्याची जबाबदारी आहे. महावितरणकडे शनिवारी २५,८०८ मेगावॅटची वीज मागणी नोंदविली गेली. हा आतापर्यंतचा उच्चांक आहे. यापूर्वी दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी २५,४१० मेगावॅट तर १४ एप्रिल २०२२ रोजी २५,१४४ मेगावॅट अशी उच्चांकी वीजमागणी नोंदविली गेली होती. या मोसमात पाऊस चांगला झाला असल्याने कृषी पंपांसाठी विजेची मागणी वाढली असल्याचा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे.

विजेच्या मागणीचा पॅटर्न लक्षात घेऊन महावितरणच्या संबंधित विभागाने यापूर्वीच वीज खरेदी करार केले होते. त्यानुसार शनिवारची उच्चांकी वीज मागणी पूर्ण करण्यात आली. महानिर्मितीकडून ६९९६ मेगावॅट, केंद्रीय प्रकल्पांकडून ५२५२ मेगावॅट तर खासगी प्रकल्पांकडून ५७३३ मेगावॅट वीज उपलब्ध करण्यात आली. याखेरीज जलविद्युत प्रकल्पांमधून २००९ मेगावॅट, सौर उर्जा प्रकल्पांमधून ३०९३ मेगावॅट, पवन उर्जा प्रकल्पांमधून २२८ मेगावॅट आणि सहविद्युत निर्मिती प्रकल्पांमधून २४९८ मेगावॅट वीज उपलब्ध झाली. आगामी उन्हाळ्याच्या हंगामात विजेच्या मागणीत संभाव्य वाढ लक्षात घेऊन महावितरणने ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठ्यासाठी नियोजन केले आहे.

-----------

### कोणावरही दयामाया

पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ झाली. मनोज जरांगे यांच्यासह पोलिस अधिक्षक नवणीत काँवत हे मस्साजोगला गेले. दोघांच्या मध्यस्थीने देशमुख यांनी हे आंदोलन मागे घेतले. मंगळवारी सकाळी १० वाजेपर्यंत वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला नाही तर सर्व ग्रामस्थ आत्मदहन करणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांना फोन करुन कोणालाही सोडू नका, कोणावरही दयामाया दाखवू नका, असे आदेश दिले.

------------

### संतोष देशमुख हत्या प्रकरणात

देखील करण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणात पुन्हा एकदा नव्याने एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. नव्या एसआयटीमध्ये अनिल गुजर. विजयसिंग जोनवाल, महेश विघ्ने, आनंद शिंदे, तुळशीराम जगताप, मनोज वाघ, चंद्रकांत काळकुटे, बाळासाहेब अहंकारे, संतोष गित्ते या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या एसआयटीचे अध्यक्ष म्हणून बसवराज तेली हेच कायम राहणार आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात जी एसआयटी नेमण्यात आली होती, त्या एसआयटीवर संतोष देशमुख यांच्या कुटुंबाकडून आक्षेप घेण्यात आला होता. यातील काही अधिकाऱ्यांचे वाल्मिक कराडशी संबंध आहेत, असा आरोप देशमुख यांच्या कुटुंबाने केला होता. त्यानंतर आता एसआयटी बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बसवराज तेली हेच नव्या एसआयटीचे अध्यक्ष राहणार आहेत, मात्र यातील काही पोलीस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

------------

### टॉवर आंदोलन मागे; कराडवर मोक्का

मागे घेण्यात आले. वाल्मिक कराड सुटला तर आम्हाला जगू देणार नाही, असे देशमुख यांनी म्हटले आहे. तसेच मंगळवारी सकाळी १० वाजेपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर अख्य गाव आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. संतोष देशमुख खून प्रकरण राज्यभर गाजल्याने राज्य सरकार सुध्दा जागे झाले. त्यामुळे सीआयडी चौकशी, एसआयटी चौकशी करण्याचे आदेश देत पोलिस यंत्रणा सतर्क झाली. कृष्णा आंधळे सोडता वाल्मिक कराडसह इतर आरोपी गजाआड गेले. कराड सोडता इतर आरोपींवर मकोका लावण्यात आला. मात्र कराडवर मोक्का का लावण्यात आला नाही? असा सवाल देशमुख कुटुंबासह मनोज जरांगे, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. संदिप क्षीरसागर यांनी आक्रमक भुमिका घेतली. कराड याला मोक्का लावण्यात यावा, कराडवर खूनाचा गुन्हा दाखल करा, तपासाची सर्व माहिती देशमुख कुटुंबास द्यावी, या मागण्यासाठी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सोमवारी मस्साजोग येथे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. यावेळी मनोज जरांगे आणि पोलिस अधिक्षक नवणीत काँवत आंदोलनस्थळी जावून देशमुख यांची मनधरणी केली. शेवटी जरांगे आणि पोलिस अधिक्षक यांच्या मध्यस्थीनंतर देशमुख यांनी आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुध्दा दखल घेत सीआयडीचे अधिकारी सचिन पाटील आणि पोलिस अधिकारी नवणीत काँवत यांना फोन करुन कडक पावले उचलण्याचे आदेश दिले. दरम्यान मंगळवारी सकाळी १० वाजेपर्यंत जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर मस्साजोग हे अखख गावच आत्मदहन करणार असल्याचा ग्रामस्थांनी इशारा दिला आहे.

-------------

### जरांगे समर्थकाकडून

बोलतांना दिसत आहेत. तर फोनवरील समोरचा माणूस त्यांना धमकी देत असल्याचे दिसत आहे. यामध्ये असे म्हटले आहे, उठसूठ तुम्ही मराठ्यांना बोलताय, मनोज जरांगेंना बोलताय.. यावर लक्ष्मण हाकेंकडूनही उत्तर देण्यात आले आहे. मनोज जरांगे यांनीही स्वत:चे घरदार बघाव ना. त्यावर समोरच्या माणसाने त्यांच्यावर शिव्यांचा भडिमार करत तुमची तेवढी लायकी नाही, अशा शब्दांत आलेल्या धमकीवर लक्ष्मण हाकेंनी पलटवार केला आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५




## वडवणी येथील,शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जागतिक युवा दिन उत्साहात साजरा

वडवणी । प्रतिनिधी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,वडवणी येथे दि.१२ जानेवारी २०२५ रोजी जागतिक युवा दिन स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम संपन्न झाला.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य बनगे एस.ओ.यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक युवा दिनानिमित्त संस्थेतील यशस्वी उद्योजक माजी विद्यार्थी व संस्थेमध्ये आयोजित केलेल्या रांगोळी,क्रिकेट,निबंध स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ,शाल देऊन गौरव करण्यात आला तसेच स्वच्छता अभियान राबवले आणि जागतिक युवा दिनानिमित्त आयोजित केलेल्या उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशस्वी उद्योजक बाबासाहेब कान्होबा कुरकुटे होते तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.वंदना शेषेराव जगताप व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.अंडील जी.पी.व प्रा.डॉ.अशोक देवगुडे तर मान्यवर म्हणून उद्योजक श्री. देशपांडे सुहास व सरपंच नाईकवाडे बंडू तसेच श्री.इंगोले सर,श्री.राठोड सर,श्री,मुळे सर,देशपांडे मॅडम,मोमीन सर,कु.ठोंबरे मॅडम,श्री.मंदे सर,उच्छैमा सर,श्री केदार सर व श्री.आंधळे अशोक आदींजन उपस्थित होते.

# समाज संघटित होण्यासाठी सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता - केंद्रीय ऊर्जामंत्री श्रीपाद नाईक

अंबाजोगाई(प्रतिनिधी):- कोणत्याही समाजाच्या सामाजिक संघटनेसाठी सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता असते अशी भावना देशाचे केंद्रीय नविकरण ऊर्जा मंत्री नामदार श्रीपाद नाईक यानी व्यक्त केली. ते अखिल भारतीय जयस्वाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महाधिवेशनात बोलत होते. यावेळी माजी मंत्री प्रकाश चौधरी , संरक्षक प्रदीप जयस्वाल, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल, माजी मंत्री आमदार श्रीमती अनुपमा जायसवाल, राष्ट्रीय महासचिव अटल गुप्ता, राष्ट्रीय कोषाध्यक्ष अजय जायसवाल, राष्ट्रीय युवा अध्यक्ष राजा चौधरी, सुरेंद्रपाल अहलुवालिया चंदीगड, कुमार गौड हैदराबाद, लालचंद गुप्ता प्रमुख अखिल भारतीय कलचुरी स महासभा , श्रीमती अर्चना जायसवाल, श्रीमती सुमन राय महिला अध्यक्ष अ भा कलचुरी स महासभा यांच्यासह देशभरातून विविध गणमान्य पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या महाधिवेशनाची सुरुवात नाविन्यपूर्ण असा उपक्रम महारक्तदान शिबिर घेऊन करण्यात आली. व्यासपीठावर सर्वप्रथम सहस्त्रबाहु भगवान अर्जुन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.त्यानंतर स्वागतगीत श्रीमती उषा रामधामी यांनी गायले. याप्रसंगी महासभेचे मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांनी आगामी काळ सन २०२५-२८ साठी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून राजकिशोर मोदी यांच्या नावाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय ऊर्जामंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी राजकिशोर मोदी यांना राष्ट्रीय अध्यक्ष पदाची तर इतर पदाधिकारी यांना त्यांच्या पदांची शपथ दिली. आपल्या मनोगतात अशोक जायसवाल यांनी आपल्या समाजाला विविध अंगांनी पुढे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीच्या हाती राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे सोपवताना अतिशय आनंद होत असल्याचे नमूद केले. यावेळी उपस्थित सर्व महासभेने टाळ्यांच्या गजरात राजकिशोर मोदी यांच्या नावाचे स्वागत व अभिनंदन केले. समाजातील मुलांना उच्चशिक्षित करून त्यांना मोठे व्यावसायिक तथा उद्योग क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी प्रेरित करण्याचे आवाहन अशोक जायसवाल यांनी केले. समाजकारण बरोबरच राजकारणात देखील आपल्या पाल्याणा पुढे येऊ देण्याचा प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले. या महाधिवेशनात राष्ट्रीय संरक्षक प्रदीप जयस्वाल, यांच्यासह लालचंद गुप्ता, प्रकाश चौधरी,



श्रीमती अर्चना जायसवाल ,अनुपमा जायसवाल यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. या अधिवेशनाद्वारे समाज एकसंघ होत असल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त करतांना नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या महाधिवेशनाचे प्रमुख पाहुणे केंद्रीय ऊर्जामंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी उपस्थित महासभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी समाज समाज संघटित होण्यासाठी अशा प्रकारच्या सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता असते असे मत व्यक्त केले. त्यांनी सर्वप्रथम नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाज संघटित करणे हे अतिशय अवघड काम आहे. समाजाच्या उन्नतीसाठी समाज संघटन अतिशय महत्वाचे असून हे संघटन राजकिशोर मोदी हे अतिशय उत्तमरीत्या करून सांभाळतील अशी अपेक्षा व्यक्त केली. समाजात आजही अनेक उपेक्षित घटक आहेत त्यांच्या पर्यंत पोचून त्यांना देखिल समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन नामदार श्रीपाद नाईक यांनी नवनिर्वाचित टीमला केले. या कामासाठी आपण देखील सर्वांना वेळोवेळी सहकार्य करू असे आश्वासन नामदार श्रीपाद नाईक यांनी याप्रसंगी दिले. अखिल भारतीय जाय सवाल सर्ववर्गीय महासभेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी शेवटी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सर्वप्रथम माझ्यासारख्या एका सामान्य कार्यकर्त्याला राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी निवडले याबद्दल महासभेचे आभार व्यक्त केले. मी माझ्या कार्यशैली द्वारे या पदाला साजेसे काम करेन अशी विश्वास त्यांनी महासभेला दिला. समाजात ज्या काही उणिवा आहेत त्या दूर करण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशिल राहू असे अभिवचन राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी दिले. आपल्या समाजाला आर्थिक ,सामाजिक तसेच राजकिय स्थैर्य मिळवून देण्यासाठी सर्वांना एकसंघ करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. समाजाला समाज जणांशी जोडण्यासाठी आपण एक पूल बनण्याचे काम करू असेही मोदी यांनी उपस्थित महासभेच्या आश्वस्त केले. शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी महासभेच्या माध्यमातून सदैव प्रयत्नशिल राहण्याचा शब्द महासभेच्या समोर राजकिशोर मोदी यांनी दिला. महिला सशक्तीकरण करून त्यांनादेखील त्यांचे अधिकार देण्याचे कार्य आपल्या कार्यकाळात केले जाईल. समाजात युवक युवतींनी आपसी मतभेद टाळून त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी राजकिशोर मोदि यांनी यावेळी बोलताना केले. आगामी काळात शिक्षण व आरोग्यासाठी कोष निर्माण करून त्याद्वारे शिक्षणापासून वंचित तसेच पैश्याविना उपचार थांबणार नाही याची दक्षता घेतल्या जाईल अशी अपेक्षा व्यासपीठावरून राजकिशोर मोदी यांनी बोलून दाखवली. माझ्या यापुढील काळात मी कसलाही हार ,तुरे , शाल असा सन्मान स्वीकारणार नसून याच पैशातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन महासभेचे नव निर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या महाधिवेशनाद्वारे केले. या महाधिवेशनात महाराष्ट्रासह , बिहार ,राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, तेलंगाणा, छत्तीसगड यासह अनेक राज्यातील जायसवाल समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाला होता. या अधिवेशनात युवक युवती परिचय मेळावा देखील संपन्न होऊन याद्वारे अनेक युवक युवतीच्या विवाहासाठी अनेक कुटुंब एकत्रित आल्याने हे अधिवेशन सफल झाल्याचे विविध भागातून आलेल्या समाजबांधवांच्या वतीने बोलल्या जात होते. हे महाधिवेशन संपन्न करण्यासाठी महाराष्ट्र जाय सवाल संघटना, मराठवाडा जायसवाल संघटना व अंबाजोगाई जायसवाल संघटनेच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

## पिंपळगावचे अक्षय गवळी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

दिंद्रुड । प्रतिनिधी

पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने माजलगाव तालुक्यातील पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे ग्रामपंचायत सदस्य व मानवी हक्क अभियान चे युवा कार्यकर्ते आहेत. यांना समाजभूषण पुरस्काराने शनिवारी सन्मानित केले.ग्रामीण भागातील तरुणाचा हा सन्मान कौतुकास्पद आहे.





पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे छ.शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारधारेला प्रेरित होऊन सर्व समाजाची बांधीलकी जोपासत सामाजिक कार्यात कार्यरत आहेत.तळागाळातील अडल्या नडल्यांची अडचणीला धाऊन जात मदत करतात.समाज उन्नती साठी सदैव तळमळीने काम करतात याच कारणामुळे मुंबई च्या पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने अक्षय गवळी यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले.मला मिळालेल्या सन्मानामुळे माझ्या कार्याला बळ मिळाल्याचे अक्षय गवळी यांनी माध्यमांना सांगितले आहे.या कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक-अध्यक्ष श्री अंतेश नरसिंग गवळी सर, मानवी हक्क अभियानचे मुंबई प्रदेश अध्यक्ष कैलास भिसे, किशोर सूर्यवंशी (मानवी हक्क अभियान, मुंबई) प्राध्यापक संजय आढागळे अशोक शेजुळे पश्चिम उत्तर मुंबई मानवी हक्क अभियान जिल्हाध्यक्ष सह मान्यवर उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**राजमाता जिजाऊ आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त माईर एम आय टी पुणे संचलित कै. दादाराव कराड विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रसाद चिक्षे प्राचार्य रामराजे कराड अध्यक्षस्थानी होते क्रीडा विभाग प्रमुख घुले पी एस, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती केंद्रे एस एन, नाट्यविभाग प्रमुख श्री देशपांडे ए आर हे मंचावर उपस्थित होते. प्रतिमापूजन व विश्वशांती प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी साने यांनी अतिथींचा अल्पसा परिचय करून दिला. अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभा नंतर विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींचे मोलाचे मार्गदर्शन



लाभले.जात, धर्म, वंश, भाषा या पलीकडे जाऊन मानवता धर्म जपला पाहिजे हा स्वामी विवेकानंदांचा संदेश प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना दिला. चौकस बुद्धी, धैर्य, डोळस आणि मनाची शक्ती, ज्ञान संपादन करण्याची वृत्ती, अद्वितीय बुद्धिमत्ता या स्वामीविवेकानंदांच्या गुणांचा उल्लेख प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणात करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वामी विवेकानंद फक्त वाचले किंवा ऐकले पाहिजेत एवढेच पुरेसे नाही तर स्वामी विवेकानंद आत्मसात केले पाहिजेत, स्वामी विवेकानंदांसारखे आदर्श व्यक्तिमत्व घडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे असा मोलाचा संदेश आपल्या अध्यक्षीय समारोपात कराड यांनी दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पान ६ वरून...

### अन्याय,अत्याचाराचा प्रतिकार

करता येते हा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, प्रसिद्ध कवी गणपत व्यास गुरुजी यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.त्यांनी कांहीं कविता सादर केल्या . महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.रमेश सोनवळकर यांनी कवी गणपत व्यास गुरुजी यांची प्रकट मुलाखत घेतली . व्यास गुरुजी यांनी आपल्या काव्य लिखाणाचे मर्म उलगडून दाखवले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर यांनी केले त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील हे क्षण आनंदाने, उत्साहाने जगण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सागर कुलकर्णी यांनी केले बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन डॉ महेश चौरे यांनी केले.या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन स्नेह संमेलन प्रमुख तसेच क्रीडा विभागाचे संचालक प्रा. डॉ.प्रविण भोसले यांनी केले . या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के, पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ.शैलजा बरुरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे पर्यवेक्षक प्रा. श्रीकांत जवळगावकर कार्यालयीन अधीक्षक श्रीहरी रामदासी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्नेह- संम्मेलनाच्या निमित्ताने अल्पोपहार,शेला पागोटे , विविध गूणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### जबरी चोरीचा गुन्हा : गुन्हेगाराच्या

१८८/२०२४ कलम-३०५,३३१ (२) बी.एन.एस ५) गुरन-३०८/२०२४ कलम-३०९(६),३(५) बी.एन.एस ६) गुरन-२९१/२०२४ कलम-३०९(६), ३ (५) बी.एन.एस ७) गुरन-२६/२०२५ कलम-३०९(६),३(५) बी.एन.एस प्रमाणे दाखल गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच पोलीस स्टेशन पाथर्डी जि. अहिल्यानगर गुरन- ६८९/२०२४ कलम-३३१(४), ३०५ () बी.एन.एस प्रमाणे दाखल गुन्हा देखील आरोपीतांनी केलेला असले बाबत कबुली दिलेली आहे. बीड व अहिल्यानगर जिल्हयामध्ये चोरी, घरफोडी, जबरी चोरी सारखे अटक आरोपीवर गुन्हे दाखल आहेत.

### राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद

करत आहेत. याहीवर्षी दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी १० वर्षांपासून चालत आलेल्या या रक्तदान व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे भरभरून कौतूक केले. तसेच गेल्या तीन वर्षापासून युवा भारत उद्योग समुहाच्या संवाद मेळाव्याचेही आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी समुहाचे सर्वच ठिकाणाहून असलेले सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी उपस्थितांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्याविषयी थोडक्यात माहिती दिली. यावेही कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुकुंद आहेर यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार भाऊसाहेब महानोर यांनी मानल

दहा जणांनी केले रक्तदान

राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त पौळाचीवाडी येथे रक्तदान शिबिरामध्ये मुकुंद आहेर, रोहित साळुंके, गणेश जाधव, महेश बेंद्रे बेलगाव, भारत साळुंके, रामेश्वर जाधव, वचिष्ठ चव्हाण , प्रवीण आहेर उमापूर या सर्व रक्तदात्यांनी रक्तदान करून आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेने येणाऱ्या काळामध्ये कोणत्याही गरजू व्यक्तींना रक्त कमी पडू नये अशी भावना यावेळी व्यक्त केली.

### पुणे ते सेलू पत्रकार

रँलीत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.. रँली मध्ये किमान २५ गाड्या असाव्यात आणि त्यावर परिषदेचे ध्वज तसेच चलो सेलू अशा मजकुराचे बँनर्स असावेत..

रँलीत एस.एम.देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, शिवराज मिलिंद अष्टीवकर, शिवराज काटकर, मन्सूरभाई शेख, संदीप कुलकर्णी, अनिल वाघमारे गणेश मोकाशी, रवी उबाळे आदि परिषदेचे पदाधिकारी सहभागी होतील..रँली सेलू येथे पोहोचल्यानंतर परिषदेचे सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, सेलू तालुका अध्यक्ष लक्ष्मण बागल, श्री. इलियास आणि अन्य पदाधिकारी रँलीचे स्वागत करतील.



**जालना : कृषि उत्पन्न बाजार समिती येथे कै.विष्णू पवार सभागृहात आज दि १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता मॉ जिजाऊ साहेब याची जंयती व स्वामी विवेकानंद जंयती साजरी करण्यात आली यावेळी जालना बाजार समितीचे सचिव मोहन राठोड यांच्याशुभहस्ते जयंती साजरी करण्यात आली यावेळी सहा.सचिव अनिल खंडाळे, प्रसाद काकडे,राहुल भागवत, शुभम पवार, कैलास चव्हाण शे.नुर इत्यादी उपस्थीत होते.**

## स्मार्ट किड अबॅकस ॲडव्हान्स लेवलमध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**परतूर । प्रतिनिधी**

स्मार्ट किड्स अबॅकस परतुर क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच घेण्यात आलेल्या ॲडव्हान्स लेवल परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये संस्कार कंडारे, अक्षरा दळवे, वैभव येस्के, दूर्वा मातने इ. विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये संस्कार कंडारे याने ९१.००% तर अक्षरा दळवे हिने ९१.००% समीक्षा कंडारे ८८.४६, वैभव येस्के याने ८७.२४% गुण संपादन करून घवघवीत यश संपादन केलेले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्मार्ट किड्स अबॅकस क्लास परतूरच्या संचालिका सौ.सीमा कंडारे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी पालक खालापूरे सर, सौ.प्रिया गायकवाड, सतीश कंडारे, मारुती दळवे, सौ जयश्री दळवे, सौ मातने, सौ शितल सुरूंग सौ ललीता येस्के उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे परिसरात सर्वत्र कौतुक करण्यात येत असून या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन जयश्री दळवे यांनी केले.

## विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढविण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज - बाबासाहेब उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा वडवणी या केंद्राची माहे जानेवारी महिन्याची मासिक शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हापूर याठिकाणी दि.११ जानेवारी २०२५ शनिवार रोजी मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे होते तर मुख्य मार्गदर्शक अतिथी म्हणून वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे तसेच सरपंच सौ.खताळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण खताळ, केंद्रिय मुख्याध्यापक श्रीमती.तिडके मॅडम यांसह अन्य उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सावित्रीबाई फुले, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सुरेश यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी विद्यार्थी अध्ययन स्तर व लोकसहभाग याविषयी मार्गदर्शन केले. समाजाच्या सहभागातून शाळेच्या भौतिक गरजा पूर्ण होतात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस पालकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यासाठी लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. मुख्य अतिथी व मार्गदर्शक म्हणून लाभलेले गटशिक्षणाधिकारी





बाबासाहेब उजगरे यांनी निपूण भारत, भारतीय संविधान, परीक्षा पे चर्चा याविषयी मार्गदर्शन केले. निपूण भारत, विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवणे, जास्त प्रभावी शैक्षणिक साहित्यांचा वापर करुन अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढते. त्यांच्यामध्ये कूवत निर्माण होते. चिकीत्सक बुध्दिमत्तेला चालना मिळते. त्यासाठी शिक्षकांनी अध्यापनात जास्तीत जास्त शैक्षणिक साहित्य वापरावे असे सांगितले. तसेच आपले पंतप्रधान मोदीजी यांचा जो उपक्रम आहे परीक्षा पे चर्चा या उपक्रमाबाबत सर्व शिक्षकांनी व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी. व नोंदणी केल्यानंतर आपले मत व्यक्त करुन सहभाग नोंदवावा असेही आवाहन केले. तसेच भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त संविधान उपक्रम प्रत्येक महिन्यामध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार सर्व शाळांमध्ये राबवून त्याचा इतिवृत्तांत ठेवावा व विद्यार्थ्यांना संविधानाविषयी दररोज परिपाठामध्ये माहिती द्यावी. जेणेकरुन त्यांना आपल्या भारताचे संविधान याविषयी माहिती मिळेल असे सांगितले. बीड जिल्ह्यामध्ये व्ही-स्कूल या ॲप मार्फत विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर प्रत्येक महिन्याला नोंदवला जातो. तो अध्ययन स्तर सर्वांनी प्रत्यक्ष चाचपणी करुनच विद्यार्थी नोंदवावा व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवावा. सर्वांनी आपल्या शाळेची गुणवत्ता वाढवण्यासाठी व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही शेवटी ते म्हणाले. सदरील शिक्षण परिषदेमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून डोरले सर, खटावकर सर, दुधाने सर, राठोड सर, मुंडे सर यांनी दिलेल्या विषयानूसार मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक वनवे सर यांनी केले. सदरील कार्यक्रमासाठी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. सदरील शिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी भाऊसाहेब राठोड, मदन सवासे, रामचंद्र मुंडे, बर्गे मॅडम, केदार मॅडम यांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार श्रीमती.केदार मॅडम यांनी मानले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५
४

# देशी देवणी गोवंश संवर्धनासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार - पंकजा मुंडे

परभणी

पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. तसेच देशी देवणी गोवंश संवर्धन व जतन प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री पंकजा मुंडे यांनी मराठवाडा विभागातील पशुसंवर्धन व प्रदूषण नियंत्रण मंडळ विभागाचा आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन आयुक्त प्रवीणकुमार देवरे, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, खासगी सचिव मंदार वैद्य, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त गणेश देशपांडे, राजकुमार पडीले, डॉ. प्रशांत चौधरी तसेच मराठवाडा विभागातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी उपस्थित होते. मराठवाड्यातील विभागाची वाटचाल, विभागाची ध्येय धोरणे, विभागातील पशुधन,





२१ वी पशुगणना, राज्य व केंद्र पुरस्कृत योजना, दुभत्या जनावरांसाठी खाद्य सुधारणा कार्यक्रम, वैरण विकास कार्यक्रम, पशुरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत लसीकरण, जिल्हा निहाय पशुधन नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केंद्र, स्मार्ट योजना, दुग्ध विकास प्रकल्प, पुशपालनासाठी शेतकऱ्यांना सुलभ वित्त पुरवठा, दूध संकलनाचे जाळे तयार करणे, चारा निर्मितीत स्वंयपूर्ण होणे आदींसह विभागाचा आढावा घेतला. मंत्री मुंडे म्हणाल्या, की पशुसंवर्धन विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.तालुका पातळीवरील पशुवैद्यकीय दवाखाने तसेच पदभरती याबाबतही प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

# शेतातील तण काढण्यासाठी यंत्र ठरतेय फायदेशीर



देशातील अनेकजण शेती या व्यवसायावर अवलंबून आहेत. पण शेतीसाठी भरपूर श्रम, वेळ आणि संसाधने लागतात. शेती करणे सोपे, किफायतशीर आणि मजबूत करता यावे यासाठी सध्या अनेक यंत्रणाच वापर केला जात आहे. नुकतेच शेतीसाठी 'सानेडो' हे नवीन यंत्र विकसित करण्यात आले असून, ते शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आणि चांगला पर्याय आहे.

सानेडो मशीन हे ट्रॅक्टरप्रमाणे काम करते जे शेतात तण काढण्यासाठी वापरले जाते. त्याची सर्वात मोठी खास गोष्ट म्हणजे यात हायड्रोलिक सिस्टीमसह ५-फॉल कल्टिव्हेटर आहे, त्याचा वापर तण नांगरणी आणि दोन्ही बेडवर माती मशागत करण्यासाठी केला जाऊ शकतो. यामुळे याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. तसेच कमी वेळामध्ये शेतातील अनेक कामे देखील होणार आहेत. सानेडो मशीन अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अतिशय सुलभ मशीन आणि सक्रिय मशीन आहे, हे यंत्र खास तण काढण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे मशीन १० हॉर्स पॉवर इंजिनसह येते आणि प्रति तास फक्त ८०० मिली डिझेल वापरते. हे यंत्र मोठमोठ्या शेतातील तण काढण्याचे काम करते. हे यंत्र प्रगत तंत्रज्ञान आणि परीक्षणाद्वारे बनवले जाते आणि कृषी क्षेत्रात वापरण्यासाठी शिफारस केली जाते. सानेडो मशीन अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी आर्थिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय सोयीचे आहे. त्याची किंमत फक्त १.२५ लाख रुपये आहे आणि त्यात डिझेलचा वापर खूप कमी आहे, याचा वापर शेतीसाठी केला जातो, जेणेकरून शेतीची कामे सुरळीत आणि वेळेत करता येतील. यामुळे शेतीचे उत्पादन वाढण्यासही मदत होऊ शकते, ज्यातून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकते. सनाडो मशीन अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अतिशय कार्यक्षम आणि मजबूत मशागतीची सुविधा प्रदान करते. त्याची संस्था अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक मापदंडानुसार अतिशय उपयुक्त आहे जी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीला चालना देण्यासाठी मदत करू शकते.

# उसामध्ये हे आंतरपीक देते चांगला फायदा

ऊस हे दीर्घ कालावधीचे पीक असल्याने. त्याचे पीक तयार होण्यासाठी सुमारे १० ते १२ महिने लागतात. अशा परिस्थितीत शेतकरी या मध्यंतरीच्या वेळेचा फायदा घेऊन या काळात उसाबरोबरच अशी अनेक पिके घेऊन जादा कमाई करू शकतात. त्यामुळे उसासह इतर पिकांच्या उत्पादनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळतो. ऊस उत्पादक शेतकरी केवळ एकाच पिकावर अवलंबून असेल तर त्यातून त्यांना हवा तसा नफा मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत त्यांना उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष द्यावे लागेल. उसासोबत अशी अनेक पिके आहेत जी उसापूर्वी पक्व झाल्यावर तयार होतात. या पिकांमधून फायदेशीर पिके निवडून शेतकरी उसाचे पीक तयार होण्यापूर्वी या पिकाची विक्री करून नफा कमवू शकतो.

उसासोबत कोणती पिके घेता येतात?

ज्या शेतकऱ्यांनी फेब्रुवारी-मार्चमध्ये उसाची लागवड केली आहे ते उसासोबत मूग, उडीद, धणे, मेथीची लागवड करू शकतात. हे पीक लवकर विक्रीसाठी येते आणि याला बाजार देखील चांगला असतो त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो.

असे करा नियोजन : जर तुम्हाला उसासोबत मूग वाढवायचा असेल तर त्याचे गुणोत्तर १:१ आहे, म्हणजे उसाची एक ओळ आणि मूग दुसऱ्या ओळीत लावा. जर तुम्हाला उसासोबत उडीद पिकवायचे असेल तर १:१ हे प्रमाण ठेवा. तुम्हाला उसासोबत कोथिंबीरची लागवड करायची असेल, तर ऊस आणि कोथिंबीरचे गुणोत्तर १:३ ठेवा. त्याचप्रमाणे, जर तुम्हाला उसासोबत मेथीची लागवड करायची असेल, तर त्याचे प्रमाण १:३ ठेवा.

मुग आणि उडदाला मिळतो चांगला भाव : कडधान्य पिकांपैकी मूग आणि उडीद या पिकांना बाजारात मागणी जास्त असून त्याचे भावही चांगले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी उसासोबत मूग आणि उडदाची लागवड करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकते. मध्य प्रदेशातील अनेक शेतकरी शेत रिकामे असताना मूग पिकवून अतिरिक्त कमाई करत आहेत. विशेष म्हणजे मध्यप्रदेशात राज्य सरकार स्वतः दरवर्षी किमान आधारभूत किमतीत शेतकऱ्यांकडून मूग खरेदी करते. अशा परिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना मूग लागवडीतून अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे.

उसासह मूग आणि उडीद लागवडीचा फायदा : उसासोबत मूग आणि उडीदाची लागवड केल्यास जमिनीची सुपीकता वाढते. त्याचबरोबर खतांवर होणारा खर्चही कमी होईल. तुम्ही कडधान्य पिकाला दिलेल्या खताचा फायदा ऊस पिकालाही मिळेल.

त्याच वेळी, आपल्याला या पिकांच्या सिंचनासाठी अतिरिक्त व्यवस्था करावी लागणार नाही. तुमच्या उसाच्या पिकाबरोबरच या पिकांनाही आपोआप पाणी दिले जाईल. अशाप्रकारे ऊस पिकासह मूग आणि उडीद पिकाची लागवड करून कमी खर्चात जास्त नफा मिळवता येतो. दुसरीकडे, ऊस पिकाला मूग आणि उडीद लागवडीतून नायट्रोजन मिळते, जे त्याच्या चांगल्या उत्पादनासाठी फायदेशीर आहे.



## दिन विशेष

### जागतिक दिवस
### मकर संक्रमण

### महत्वाच्या घटना

१७६१ : मराठे आणि अफगाणी यांमध्ये पानिपतची तिसरी लढाई झाली. दुसर्याच दिवशी संपलेल्या या युद्धात अफगाण्यांचा विजय झाल्यामुळे भारतीय इतिहासाचा चेहरामोहराच बदलुन गेला.
१९२३ : विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली.
१९४८ : 'लोकसत्ता' हे मराठी वृत्तपत्र सुरू झाले.
१९९४ : मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला.
१९९८ : दाक्षिणात्य गायिका एम.एस. सुब्बलक्ष्मी यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान जाहीर.
२००० : ज्येष्ठ समाजसेवक व गांधीवादी विचारवंत मुरलीधर देविदास ऊर्फ 'बाबा' आमटे यांना १९९९ चा गांधी शांतता पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५१ : अकबराच्या नऊ रत्नांपैकी एक अबुल फ़ज़ल यांचा जन्म.
१८८२ : रघुनाथ धोंडो तथा र. धों. कर्वे समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन आणि लैंगिक शिक्षण यांसाठी बुद्धिवादी विचारप्रवर्तन व प्रत्यक्ष कार्य करणारे विचारवंत, महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे ज्येष्ठ पुत्र (मृत्यू: १४ आक्टोबर १९५३)
१८८३ : निना रिकी जन्माने इटालियन असलेल्या फ्रेंच फॅशन डिझायनर (मृत्यू: ३० नोव्हेंबर १९७०)
१८९२ : शतायुषी क्रिकेटमहर्षी प्रा. दिनकर बळवंत तथा दि. ब. देवधर प्रथमश्रेणीचे ६२ सामने, १०० डाव, ११ वेळा नाबाद, ९ शतके, ३९५१ एकूण धावा, ४४.३९ सरासरी. भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री (१९६५) व पद्मविभूषण (१९९१) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. (मृत्यू: २४ ऑगस्ट १९९३)
१८९६ : 'रिझर्व बँक ऑफ ईंडिया' चे पहिले गव्हर्नर सर चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख उर्फ सी. डी. देशमुख (मृत्यू: २ आक्टोबर १९८२)
१९०५ : दुर्गा खोटे हिन्दी व मराठी चित्रपटातील अभिनेत्री. सुमारे ५० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांत भूमिका केला. १९८२ मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९१)
१९०८ : ज्येष्ठ पत्रकार आणि रॉयवादी विचारवंत द्वा. भ. कर्णिक यांचा जन्म.
१९१८ : भारतीय महिला स्वातंत्र्य सैनिक सुधाताई जोशी याचा जन्म.
१९१९ : सय्यद अख्तर हुसेन रिझवी ऊर्फ 'कैफी आझमी' गीतकार (मृत्यू: १० मे २००२)
१९२३ : चित्तरंजन कोल्हटकर अभिनेते (मृत्यू: २५ आक्टोबर २००९)
१९२६ : महाश्वेता देवी बंगाली लेखिका नारायण कार्तिकेयननारायण कार्तिकेयन
१९३१ : सईद अहमद शाह ऊर्फ 'अहमद फराज' ऊर्दू शायर (मृत्यू: २५ ऑगस्ट २००८)
१९७७ : नारायण कार्तिकेयन भारतीय फॉर्म्यूला कार रेसिंग ड्रायव्हर
१९८२ : माजी प्रधान मंत्री इंदिरा गांधींनी२ सूत्री कार्यक्रमाची घोषणा.
१९९२ : माजी भारतीय क्रिकेटर दिनकर बळवंत देवधर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४२ : एडमंड हॅले हॅलेच्या धूमकेतूचा शोध लावणारे ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, भूवैज्ञानिक, गणितज्ञ, हवामानशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म:८ नोव्हेंबर१६५६)
१७६१ : सदाशिवराव भाऊ पानिपतच्या तिसर्या युद्धातील सरसेनापती (जन्म: ४ ऑगस्ट १७३०)
१७६१ : विश्वासराव पानिपतच्या ३ र्या युद्धात मारले गेलेले नानासाहेब पेशव्यांचे ज्येष्ठ चिरंजीव (जन्म: २ मार्च १७४२)
१८९८ : इंग्लिश लेखक आणि गणितज्ञ लुईस कॅरोल यांचे निधन.
१९२० : डॉज ऑटोमोबाईल कंपनीचे सहसंस्थापक जॉन फ्रान्सिस लबाडी यांचे निधन. (जन्म: २५ ऑक्टोबर १८६४)
१९९१ : चित्रगुप्त श्रीवास्तव ऊर्फ 'चित्रगुप्त' संगीतकार (जन्म:१६ नोव्हेंबर१९१७)
२००१ : फली बिलिमोरिया माहितीपट निर्माते

# झेंडूच्या या २ वाणांची लागवड कराल तर मिळू शकतो दिवाळीला चांगला भाव

सध्या शेतकरी फुलशेती करण्यास जास्त प्राधान्य देत आहेत. यामधून चांगला नफा राहत असल्याने अनेकजण फुलांची शेती करत आहेत. यामध्ये अनेक शेतकरी झेंडूची शेती मोठ्या प्रमाणात करतात, भारतातील फुलांच्या व्यवसायात झेंडूला महत्त्वाचे स्थान आहे. धार्मिक आणि सामाजिक प्रसंगी याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

झेंडूच्या फुलाची पूजा करण्याबरोबरच लग्न, वाढदिवस, शासकीय व खासगी संस्थांमध्ये आयोजित विविध कार्यक्रमात मंडप, मंडप आणि गाड्या, ऋषी आदी सजवण्यासाठीही त्याचा उपयोग केला जातो. त्यामुळे झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असल्यामुळे बाजारात या फुलांना भाव देखील चांगला मिळतो त्यामुळे अनेकजण झेंडूची लागवड करतात. जर योग्य नियोजन करून झेंडूची लागवड केली तर त्यामधून चांगला नफा राहील.

झेंडू लागवडीसाठी माती : कोणत्याही पिकाची लागवड करायची म्हटले की त्यामध्ये योग्य मातीची निवड करून पिकाची लागवड करणे गरजेचे असते. असे केल्यास पीक चांगले जोमात येते. तुम्हाला जर झेंडू लागवड करायची असेल तर त्यासाठी चिकणमाती, मटियार चिकणमाती आणि बलुआर चिकणमाती ही झेंडूच्या लागवडीसाठी उत्तम आहे, ज्यात पाण्याचा निचरा योग्य आहे.

झेंडू लागवडीसाठी खत व्यवस्थापन : खत आणि खतांच्या चांगल्या उत्पादनासाठी, शेत तयार करण्यापूर्वी २०० क्विंटल प्रति हेक्टर खत जमिनीत मिसळा. यानंतर १२०-१६० कि.ग्रॅ. नायट्रोजन, ६०-८० किग्रॅ. स्फुरद आणि ६०-८० किग्रॅ. पोटॅशचा वापर हेक्टरी दराने करावा. शेताची शेवटची नांगरणी करताना अर्धी मात्रा नत्र आणि पूर्ण प्रमाणात स्फुरद व पोटॅश जमिनीत मिसळावे. नत्राचा उरलेला अर्धा डोस लागवडीनंतर ३०-४० दिवसांच्या आत वापरा.

झेंडूच्या व्यावसायिक जाती : झेंडूच्या फुलांचे अधिक उत्पादन घेण्यासाठी पारंपरिक वाणांच्या जागी सुधारित वाणांची लागवड करावी. झेंडूच्या काही प्रमुख सुधारित जाती खालीलप्रमाणे आहेत.

१) आफ्रिकन झेंडू : आफ्रिकन झेंडूची लागवड केल्यास त्याची झाडे सुमारे १ मीटर उंच होतात. फुले गोलाकार असतात. त्याच्या फुलांचा रंग पिवळा आणि केशरी असून फुले चांगली मोठी होतात. आफ्रिकन झेंडू अंतर्गत व्यावसायिकरित्या पिकवलेल्या जाती पुसा ऑरेंज, पुसा स्प्रिंग, आफ्रिकन यलो इत्यादी आहेत.

२) फ्रेंच झेंडू : या प्रजातीची उंची सुमारे २५-३० सेमी आहे. त्यात फारशा फांद्या नाहीत, पण त्यात इतकी फुले येतात की संपूर्ण झाड फुलांनी झाकून जाते. या प्रजातीच्या काही सुधारित जाती म्हणजे रेड ब्रॉकेट, क्यूपिड यलो, बोलेरो, बटन स्कॉच इत्यादी आहेत. याची लागवड केल्यावर देखील तुम्हाला चांगला फायदा होईल.

कीड आणि रोग व्यवस्थापन : लीफ हॉपर्स, रेड स्पायडर इत्यादींमुळे झेंडूचे खूप नुकसान होते. त्यांना रोखण्यासाठी मॅलेथिऑन ०.१ टक्के फवारावे. मोझॅक पावडर बुरशी आणि पाय रॉट प्रामुख्याने झेंडूमध्ये आढळतात. मोझीक वनस्पती उपटून जमिनीत गाडून टाका आणि झाडांवर कीटकनाशके फवारणी करा, जेणेकरून मोझॅक विषाणू पसरवणाऱ्या कीटकांवर नियंत्रण ठेवता येईल आणि ते इतर वनस्पतींमध्ये पसरत नाही. पावडर बुरशी नियंत्रणासाठी ०.२% सल्फरची फवारणी करा. यासाठी अधिकच सल्ला तुम्ही कृषी विभागाकडून घेऊ शकता.



cmyk



# स्वत:तील गुण दोषांची ओळख शेला पागोटे कार्यक्रमातून होतो-प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे

धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी व वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य श्री. इं. ना. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. राम शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पारितोषिकांचे वाचन उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे यांनी केले. महाविद्यालयाकडून आदर्श प्राध्यापकासाठी दिला जाणारा कै. गयाबाई बाळकृष्ण पाटील पारितोषिक रोख रुपये ५०१ श्री. नागोराव वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. तर विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य शाखेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास मारोतीराव कुंभार पारितोषिक रुपये ५०१, कै. स्वातंत्र्यसैनिक नारायण मारोती कागदे पारितोषिक रुपये ५०१, कै. दीपक व राजेंद्र कुंभारे पारितोषिक रुपये १००० कु. तोष्णीवाल भाग्यश्री या विद्यार्थिनीने मिळविले.

कै. फकीरराव ज्ञानबा सावंत पारितोषिक रुपये २५१ जाधव सुजाता यांनी, कै.जयदेव डोंगर सावंत पाटील पारितोषिक रुपये २५१, कै. यमुनाबाई अंबादास देशपांडे पारितोषिक रुपये २५१ कै. निवृत्ती सिद्राम गायकवाड पारितोषिक रुपये २५१ कु. श्रद्धा शेळके हिने प्राप्त केले. कै. शंकरराव निरोदिया स्वामी पारितोषिक बारावी वाणिज्य शाखेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ५०१ रुपये बक्षीस ऋतुजा शंकर पवार या विद्यार्थ्याने मिळविले. कै. मथुराबाई विश्वनाथ चाळक पारितोषिक रुपये २५१ कला शाखेतून प्रथम आल्याबद्दल रत्नेश्वर लहू कसपटे या विद्यार्थ्याने मिळविले. कै. मंदोदरीबाई शंकरराव बागडे पारितोषिक बारावी विज्ञान शाखेतील प्रथम आलेली देवयानी धनंजय थोरात या विद्यार्थिनीने मिळविले. तसेच जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल ऋतुजा सोळंके व पूजा लोकरे या विद्यार्थिनींना तर सहभागाचे विजय उकंडे या विद्यार्थ्यास मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश शिंदे यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विभागाच्या वतीने प्रा. अशोक शिनगारे यांनी आयोजित केलेल्या व सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रा. विनायक कापावार आयोजित केलेल्या स्पर्धांत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राम लोखंडे यांनी केले. या प्रसंगी आयोजित शेला पागोटे कार्यक्रम निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून स्वत: मधील गुणदोषांची माहिती होते. यामुळे आपणास स्वत:मधील उनिवा व चांगल्या गुणांचा परिचय होऊन स्वत:ला सिद्ध करण्यासाठी मदत होते. शेलापागोटे कार्यक्रमाचा आनंद स्वच्छंदीपणाने घ्यावा. आपल्यावरील शेलापागोटा मोठ्या मनाने स्वीकारावा. या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन केले. या प्रमुख अतिथी धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. देविदास बाळासाहेब वाघमोडे साहेब यांनी प्रथम शेलापागोटा वाचून कार्यक्रमाची सुरुवात केली. क्रीडा विभाग व सांस्कृतिक विभाग आयोजित विविध स्पर्धांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. राम लोखंडे यांनी केले. संगीत शेला पागोटे करिता तांत्रिक सहाय्य डॉ. अनंता गाडे यांनी केले. शेलापागोटा वाचन उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, डॉ. अशोक लाखे, डॉ. नितीन कुंभार, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. प्रताप भानुसे, प्रा. विराज देशमुख यांनी केले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, आयक्यूएससी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. विनायक कापावार यांनी मानले.



## स्वामी विवेकानंद युवा गौरव पुरस्काराने संकल्प संस्थेला सन्मानित



वडवणी। प्रतिनिधी

पसायदान सेवा प्रकल्पाच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून अनाथांचे घर पसायदान सेवा प्रकल्प यांच्यावतीने अतिशय प्रतिष्ठित समजला जाणारा ''स्वामी विवेकानंद युवा गौरव पुरस्कार'' सामाजिक क्षेत्रातील श्री दत्ता मामा बारगजे, शांतीवनचे श्री.दीपक काका नागरगोजे, श्री दत्ताजी नलावडे, श्री व सौ विधाते दांपत्य, पत्रकार अशोक खाडे, पसायदानाचे सर्वेसर्वा श्री गोवर्धनजी दराडे रंजनाताई, व इतर मान्यवरांच्या हस्ते संकल्प संस्थेला प्रदान करण्यात आला.

यावेळी श्री कैलास भागवत चोले, व सौ. रेखा कैलास चोले यांनी सन्मान स्वीकारून पसायदान सेवा प्रकल्पाचे कर्तज्ञता व्यक्त केली. यावेळी संकल्प संस्थेविषयी बोलत असताना इन्फंट संस्थेचे सर्वेसर्वा श्री दत्ता मामा बारगजे यांनी अगदी होतकरू व्यक्तींना हा पुरस्कार दिला आहे त्याबद्दल पसायदान प्रकल्पाचे अभिनंदन केले. तसेच दीपक काका नागरगोजे यांनी आजच्या पुरस्कारासंदर्भात बोलत असताना शून्यातून सुरुवात करणाऱ्या व्यक्तींना हा युवा गौरव पुरस्कार देऊन जो सन्मान केला जातोय तो खरच कौतुकास्पद आहे अशा भावना व्यक्त केल्या तर डॉ.दत्ता नलावडे यांनी संकल्प संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून मी साक्षीदार असून अथक परिश्रमातून उभा राहिलेली संस्था म्हणजे संकल्प होय असे उद्गार काढून संस्थेचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सांगता गझल मुशायर या कार्यक्रमाने करण्यात आली. या सोहळ्यासाठी संकल्प संस्थेचे मार्गदर्शक श्री पंडित चव्हाण सर, श्री प्रकाश शिंदे सर,सौ संध्या शिंदे मॅडम तसेच संकल्प परिवारा वरती प्रेम करणारे मान्यवर उपस्थित होते.

# चक्रधर स्वामींनी मानवधर्मास सर्वोच्च प्राधान्य दिले - राज्यपाल बागडे

## महाचिंतनीचा समारोप दहा हजार भाविकांनी घेतला महाप्रसाद

जालना । प्रतिनिधी

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी अज्ञान ,अंधश्रद्धेतून समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न करत वर्ण ,जाती, व्यवस्थेला आव्हान दिले. जात , पंथ ,भेदभाव न पाळता आपल्या वागण्याने दुसऱ्याला त्रास, वेदना होऊ नये, हा मानवतेचा धर्म शिकवला. सोबतच मानवधर्मास चक्रधर स्वामींनी सर्वोच्च प्राधान्य दिले, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी महाचिंतनीच्या समारोपप्रसंगी केले.

राजपूत वाडी परिसरातील ज्ञान संजीवनी कॅम्पस मध्ये तीन दिवसांपासून सुरू असलेल्या '' महाचिंतनी '' चा शनिवारी ( ता. ११) राज्यपाल बागडे यांच्या उपस्थितीत समारोप झाला. यावेळी स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ.नारायण कुचे, आ.अनुराधा चव्हाण, महंत बाभुळगावकर शास्त्री, संजीवनी हॉस्पिटलचे डॉ.बळीराम बागल, डॉ. कोमल ठाकरे, ज्येष्ठ पत्रकार गुलाबराव पाटील, पंडितराव भुतेकर, रामेश्वर भांदरगे, सभापती राधाकृष्ण पठाडे , संदीप कपाटे, आचार्य कळमकर बाबा, म. दर्यापूरकर बाबा ,महंत यक्षदेव बाबा, वायंदेशकर बाबा, योगेश अक्कर, डॉ.श्याम बागल, प्रभाकर बागल, दामू नवपूते, शिवाजी बागल, डॉ. प्रशांत बांदल, यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यपाल श्री. बागडे पुढे बोलतांना म्हणाले, भक्ती, श्रद्धा असावी मात्र आजही आजारी पडल्यावर काही लोक देवाला नवस बोलतात, नारळ फोडतात. सगुन पाहणं कितपत योग्य आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रोजच्या आचार , विचार आणि व्यवहारात जात आणू नये. आपण सर्व एक आहोत, हा चक्रधर स्वामींनी दिलेला संदेश जोपासला पाहिजे असे त्यांनी नमूद केले. भारताने जगाला शून्य ,दशमान पद्धती सोबतच प्रचंड विद्या दिली. मात्र बाहेरून आलेल्यांनी इथल्या धार्मिक भावना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. देव, धर्मग्रंथ जाळले. महिलांनीच संस्कृती जिवंत ठेवली असून शिकलेल्या पालकांनी बालकांची स्मरणशक्ती, बौद्धिक क्षमता वाढली पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन राज्यपाल बागडे यांनी केले. महंत बाभुळगावकर शास्त्री यांनी दुष्टांचे भले व्हावे , त्यांचे कौतुक करण्याची सुरुवात महानुभाव आणि वारकरी संप्रदायाने केली. ठक हे सर्वकाळी असतात, आज सर्व लोक भयग्रस्त आहेत, एकमेकांवर विश्वास नाही. फसलेले, थकलेल्या लोकांची थकावट दूर व्हावी, मेलेली संवेदना जीवंत व्हावी, द्वेष नष्ट व्हावा, माणसामाणसात प्रेमभावना निर्माण व्हावी,असा काजळी काढण्याचा प्रयत्न महाचिंतनीद्वारे सुरू असून वारकरी - महानुभाव अशा सर्व पंथांच्या लोकांना एकत्र करून विश्वास निर्माण करायचा आहे असे नमूद करत सौजन्य सर्व संप्रदायांचा आत्मा आहे, असे बाभुळगावकर शास्त्री यांनी शेवटी सांगितले. आ. बबनराव लोणीकर यांनी ज्वलंत हिंदुत्व, धर्म, पंथ एकत्र आणून देशभक्ती, राष्ट्र निर्माणाचे काम महाचिंतनीच्या माध्यमातून होत असून आपल्या मतदारसंघातील महानुभाव पंथाच्या सर्व श्रीकृष्ण मंदिरास सभामंडप देणार असल्याचे आ. लोणीकर यांनी यावेळी जाहीर केले. प्रास्ताविकात डॉ. बळीराम बागल यांनी आज समाज - पंथांमधील दुरावा दूर करून एकत्र आणण्यासाठी महाचिंतनी हे उत्तर असून चिंतनीच्या जडण-घडणीसाठी आ.खोतकर यांनी मोलाचे सहकार्य केले, असे सांगून शक्ती- भक्तीच्या योगातून नवनिर्माण घडते. आपण केवळ खारीचा वाटा उचलला यात सर्वांचे सहकार्य लाभले, अशी भावना डॉ. बागल यांनी व्यक्त केली.

नागपूर येथील संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. कोमल ठाकरे यांना यंदाचा चिंतनी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी सत्कारास उत्तर दिले. सूत्रसंचालन प्रा. बागल यांनी केले तर प. पू. सुदाम शास्त्री यांनी आभार मानले. यावेळी महिला व भाविकांची प्रचंड संख्येने उपस्थिती होती. शेवटी दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



### पालकांची स्वतंत्र चिंतनी घ्यावी : आ.खोतकर

काजळ्यापासून सुरू झालेला महाचिंतनीचा प्रवास आता व्यापक बनला आहे. राज्यात चिंतनीला एक वेगळे वलय प्राप्त झाले असून शाळकरी , महाविद्यालयीन मुला- मुलींमध्ये आत्म जाणीव, आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी, वागणे सुधारावे याकरिता पालकांसाठी वेगळी चिंतनी घ्यावी. अशी संकल्पना स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी याप्रसंगी मांडली. सलग २८ वर्षे राज्यपाल झाल्यानंतर सुद्धा बागडे यांच्या मनातील भाव आणि चिंतनीशी जोडलेली त्यांची नाळ कायम असल्याचे पाहून सर्वांना ऊर्जा मिळते. असेही आ. खोतकर यांनी नमूद केले.

# हसनापुर येथे शाकंभरी पौर्णिमेनिमित्त जगदंबा देवी यात्रा उत्सव

## आज कुस्त्यांचे जगी मैदान ; यात्रेस उपस्थित रहा ग्रामस्थांचे आवाहन

गेवराई : । प्रतिनिधी

तालुक्यातील गोंदी पासुन काही अंतरावर असलेल्या हसनापुर येथील गोदावरी नदी किनारी ग्रामदैवत तसेच भाविकांच्या नवसाला पावणाऱ्या कुलस्वामिनी जय भवानी जगदंबा मातेचे मंदिर आहे. शाकंभरी पौर्णिमा निमित्त दरवर्षी येथे यात्रा भरते दरम्यान याहीवर्षी शाकंभरी पौर्णिमा निमित्त दि.१३ ते १४ जानेवारी दरम्यान जय भवानी संस्थानच्या वतीने दोन दिवसीय यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता भव्य कुस्त्यांचे मैदान भरणार आहे. तरी भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन हसनापूर ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

शाकंभरी पौष पौर्णिमेनिमित्त मौजे हसनापूर येथे जय भवानी कुलस्वामिनी जगदंबा देवी यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्षानुवर्षांपासून चालत आलेली हसनापूर गावच्या यात्रेची परंपरा आजही बदलत्या युगात कायम आहे. गावाची यात्रा व बारागाड्या बदलत्या शहरीकरणात आजही संस्कृती जपणारं गोदातिरी वसलेलं गाव म्हणून हसनापूरचे नावलौकिक आहे. सोमवार दि.१३ जानेवारी रोजी भवानी मातेची पुजा देवी पातळाचा कार्यक्रम व महाआरती , दुपारी रितीरिवाजा प्रमाणे बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम, सायंकाळी भव्य दिव्य पालखी सोहळा छबिना मिरवणूक तर मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी दुपारी १२ वा भव्य कुस्त्यांचे मैदान भरणार आहे. तर यात्रेकरुंना खास मनोरंजनासाठी लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या कार्यक्रमांचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन नियोजन समिती मिरकड, मुळे, अवढळ, सातपुते, भाले, बने, पठाडे, येवले, कुंढारे, कात्रे, धोत्रे, नरवटे, भोकरे, पिंपळे, सिरसाट, सोनवणे, लुचारे, गहिरे, भालेकर, गडदे, गुंडे, वाघमारे, खंडागळे, राऊत, जाधव, पांडव, आलुरे, काळे, गाडे, बोबडे, नन्हेर, वाघराळे, डेरे, पांडे, मस्के, घरड, कांबळे, गव्हाणे व समस्त गावकरी मंडळी व यात्रा कमिटी हसनापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# गुरू रविदास महाराज जयंती कार्यकारिणी जाहीर

माजलगाव : राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संत रविदास महाराज सभागृह माजलगाव येथे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ जानेवारी रविवार रोजी बैठक आयोजित करण्यात आली सर्वप्रथम राष्ट्रमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करुन कार्यक्रमास सुरुवात केली सर्व समाज बांधवांच्या सोबत चर्चा करून जयंती अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समीतीचे सचिव हारीभाऊ सवने यांची तर उपाध्यक्षपदी ऑड गणेश गवळी, तसेच कार्याध्यक्षपदी भगवान सोनवणे ,सचिवपदी योगेश शिंदे, मार्गदर्शेक दिलीप सोनवणे, सदस्य वसंत वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आभार प्रदर्शन तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी केले या बैठकीसाठी उपस्थित युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव,जिल्हा सचिव अँड दत्ता जाधव, सुनिल भैय्या शिंदे, कार्याध्यक्ष राधाकीसन भाळशेंकर, बालासाहेब सोनवणे, पद्माकर कांबळे, अशोक कांबळे, संतोष जाधव, बबनराव पोहेकर, नामदेव पोहेकर, संतोष पोहेकर, सचिन वाघमारे, संतोष खंडागळे, मयूर वाघमारे, अविनाश त्रिमुखे,पवन खंडागळे

# आ.लोणीकर यांनी दिलेला शब्द पाळला

परतुर । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणुकीपूर्वी परतुर तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला दिलेला शब्द पाळला असून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ८००० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून सर्व ग्रामपंचायतीनी प्राधान्य क्रमानुसार गावातील लाभार्थ्यांची रजिस्ट्रेशन येत्या २४ तासाच्या आत करून घ्यावें असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, रजिस्ट्रेशन प्रक्रियेनंतर तात्काळ लाभार्थ्यांच्या विहित नमुन्यातील फाईल ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती परतूरला सादर कराव्यात असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे



आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणूक काळामध्ये मोठ्या प्रमाणात घरकुले मतदारसंघात खेचून आणणार असल्याचे सांगितले होते या पार्श्वभूमीवर लोणीकर यांनी निवडणूक संपताच घरकुलांसाठी उद्दिष्ट प्राप्त केल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहे केंद्र व राज्य सरकार हे खऱ्या अर्थाने गोरगरिबांसाठी काम करणारे सरकार असून, सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय राज्य व केंद्र सरकारने घेतलेली असून यापुढेही सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून मतदार संघाचा विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या पत्रकात नमूद केले आहे



जालना : कृषि उत्पन्न बाजार समिती येथे कै.विष्णू पवार सभागृहात आज दि १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब याची जंयती व. स्वामी विवेकानंद जंयती साजरी करण्यात आली यावेळी जालना बाजार समितीचे सचिव मोहन राठोड यांच्याशुभहस्ते जयंती साजरी करण्यात आली यावेळी सहा.सचिव अनिल खंडाळे, प्रसाद काकडे,राहुल भागवत,शुभम पवार, कैलास चव्हाण शे.नुर इत्यादी उपस्थीत होते

## जाहीर प्रगटन
## कार्यालय नगरपंचायत घनसावंगी
## जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७

**जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-५६ दिनांक:-१३/०१/२०२५**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार गोदावरी रमेश साबळे रा. धावेडी ता. जि. जालना यांनी नामे १. शेख अबुसुफियान अन्वरपाशा २. सय्यद मंजुर जाफर रा. ता. घनसावंगी जि.जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २०७० दि. ०७/०६/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ८२ दिनांक:- १३/०१/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला १. शेख अबुसुफियान अन्वरपाशा २. सय्यद मंजुर जाफर रा. ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३० सि.स.नं. - ज्याचा मिळकत क्रं १७०५/३० मधील एकुण क्षेत्र ८३.८७५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. ३३, पश्चिम :- ०९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड

दक्षिण :- प्लॉट नं. ३१, उत्तरेस : प्लॉट नं. २९

या वरील चतु:सिमा मधील ८३.८७५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

(शिक्का)

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

# बीडच्या बार्शी नाका इमामपूर रोडवर रेल्वे थांबा द्या-खुर्शीद आलम

## शिष्टमंडळाने खा. सोनवणे सह आ.क्षिरसागरांची भेटले घेतली

बीड। प्रतिनिधी

बीडकरांच्या जिव्हाळ्याच्या रेल्वे प्रश्न मार्गी लागत आहे लवकरच बीडच्या स्थानकातून रेल्वे धावताना दिसणार आहे, मात्र पालवन रोडवरील रेल्वे स्टेशन बीड शहरातील नागरिकांसाठी दूर पडू लागले आहे त्यामुळे बार्शी नाक्यावरील इमामपूर रोडवर रेल्वे थांबा करण्यासाठी ठराव घेऊन मंजुरी घ्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांचे शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांनी आज खा.बजरंग सोनवणे व आ.संदिप क्षीरसागर यांच्याकडे केली खा.बजरंग बाप्पाच्या निवासास्थानी जाऊन शिष्टमंडळासह खुर्शीद आलम यांनी निवेदन दिले आहे.

बीडचे रेल्वे स्टेशन पूर्वी बार्शी नाका इमामपूर येथे मंजूर होऊन त्या ठिकाणी रेल्वे स्टेशन व रेल्वे ट्रॅक आणि क्वार्टर देखील तयार करण्यात आलेला आहेत मात्र काही पुढारी व भूमाफियांनी रेल्वे स्टेशन पालवन रोडला घेण्याचे षड्यंत्र करून स्टेशनची जागा बदलण्यात आली बार्शी नाका स्टेशनला ६० टक्के गायरान जागा उपलब्ध आहे तसेच ज्यांच्या मालकीची जागा जाणार होती त्यांना मावेजाही गेला आहे त्यामुळे अतिशय कमी खर्चात बीडला रेल्वे धावली असते, इमामपूर रोडवरील रेल्वे स्टेशन साठी आठ कोटी २२ लाख रुपये खर्च करून बांधकाम करण्यात आलेले आहे या स्टेशनला हायवे क्रमांक २२२,२२१ तसेच बायपास व बीड ते नेकनूर हे सह फुटाचे रस्ते तयार असल्यामुळे जास्त ट्राफिक देखील होणार नाही या स्टेशन पासून नवीन जुना मोंढा जवळ आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन, पोलिस अधीक्षक कार्यालय, पोलिस मुख्यालय,बस स्टँड, तहसील कार्यालय, कोर्ट, जिल्हा परिषद, नगर परिषद, आठवडी बाजार, मेडिकल कॉलेज, विविध हॉस्पिटल्स, आडत मार्केट, पंचायत समिती सह महत्त्वाची कार्यालय देखील जवळ आहेत तसेच विविध धार्मिक व पर्यटन स्थळे सुद्धा व्यापाऱ्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठीही बार्शी नाका इमामपूर रोडवरील रेल्वे स्टेशनच सोयीचे आहेत, सोलापूर जळगाव हा रेल्वे मार्ग झाले असून भविष्यात या स्टेशनवर रेल्वेचे मोठे जंक्शन होऊ शकते सध्याचे पालवन येथील नवीन रेल्वे स्टेशन हे सर्व गैरसाईचे आहे त्यामुळे या सर्व गोष्टीच्या विचार करून बार्शी नाका इमामपूर रोड येथे रेल्वे थांबा कण्यात यावे अशी मागणी शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांनी खा. बजरंग सोनवणे आणि आ.संदिप क्षीरसागर यांच्याकडे शिष्टमंडळासह केली आहे यावेळी नगरसेवक संजय उडान, महेश शिंगण,दिपक चौगुले, अमोल अहिरे, जहुर भाई इनामदार, मैनोदिन मोमीन, शोईब इनामदार,नीम सौदागर, लतिफ खान, सैय्यद सलीम, कलीम भाई, सलीम भाई,शेख अजहर, शेख हादी आदी मान्यवर उपस्थित होते



cmyk







बीड : मकर संक्रांतीनिमित्त बाजार फुलला बीड– मकर संक्रांतीच्या पूर्वसंध्येलाच मकर संक्रांतीचा बाजार फुलला महिलांच्या पूजेसाठी लागणारे साहित्य ,वानासाठी लागणारे साहित्य ,फुले ,फळे ,इतर साहित्य बाजारात मोठ्या प्रमाणात आले होते याशिवाय महिलांना लागणारे कुंकू, हळद याची दुकाने मोठ्या प्रमाणात सजली होती. मकर संक्रांतीच्या पूर्वसंधेला सुभाष रोड ,भाजी मंडई परिसरात मोठी गर्दी झाली होती.

# आर.एन.डी. विद्यालयातून विद्यार्थ्यांना मिळते भविष्याची शिदोरी –सागर धस

## आर.एन.डी. विद्यालयात जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमाची रेलचेल!

कुसळंब । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मुगगांवच्या राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर.एन.डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालय मुगगांव येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते रांगोळी वकृत्व स्पर्धा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान देखील या ठिकाणी करण्यात आला त्याचबरोबर शिवव्याख्याते गणेश भोसले यांच्या शिवव्याख्यानाच देखील आयोजन करण्यात आले होते.

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर. एन. डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालय मुगगांव मध्ये दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव आयोजित केला जातो यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी उपक्रम आयोजित करून त्या ठिकाणी त्यांचा सन्मान केला जातो विविध स्पर्धेचे आयोजन यावर्षी करण्यात आले होते रांगोळी स्पर्धा वकृत्व स्पर्धा तसेच जिल्हा राज्यस्तरीय खेळांमधून पुढे गेलेल्या विद्यार्थ्यांचा या ठिकाणी सन्मान करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे सागर धस यांनी विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावं यासाठी सर्व गोष्टी परिपूर्ण करण्यासाठी संस्थेला योग्य मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांनाही पुढील योग्य दिशा देण्यासाठी बळ मिळावं असे मार्गदर्शन केले तसेच शिवव्याख्याते गणेश भोसले यांनी त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे मार्गदर्शक तत्वे सांगितले आणि जगण्याचा मंत्र सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्याचे काम केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय खोटे यांनी संस्थेविषयी आणि भविष्यातील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना मोठ्या पदावर घेऊन जाण्यासाठी आम्ही त्यांना योग्य ते शिक्षण देण्याचा प्रयत्न करू असेही सांगितले तसेच पत्रकार प्राध्यापक सचिन पवार यांनी देखील मनोगत व्यक्त करताना महापुरुषांचे विचार आचरणात



आणावेत आणि त्यांचा इतिहास वाचताना त्यांचे विचार घेताना त्यांनी केलेला संघर्ष हा डोळ्यासमोर ठेवून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करत रहावे असे सांगितले त्याचबरोबर अनेक मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते सागर आप्पा धस, युवा उद्योजक महेश दादा हंबर्डे, माऊली आप्पा जरांगे, गोवर्धन सुळे कांतीलाल गिरी तर एक क्रमाचे अध्यक्ष म्हणून राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर एन डी उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मुगगांवचे माजी सरपंच संजयजी खोटे हे होते. तरी या कार्यक्रमासाठी रघुनाथ सुळे चेअरमन निवडुंगा, भीमराव सरोदे सर, प्राचार्य भवर सर, मुख्याध्यापक येटकळ सर, शिरसाट सर, कापसे सर, गिरी सर, प्राध्यापक अशोक पवार सर, लगड सर साळुंखे सर कटके सर, प्राध्यापक सचिन पवार, तांबारे सर, प्राध्यापक गजधने, प्राध्यापक महादेव वराड, प्राध्यापक माणिक वराड, इंगळे, शेषराव सुळे, त्रिंबक गाडे, नितीन थोरात यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले प्रस्ताविक भवर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खोटे सर यांनी केले.

### संजय खोटे यांच्या संकल्पनेतून उभा राहिलेले आर एन डी विद्यालय

एक सर्वसामान्य व्यक्ती काय करू शकतो हे संजय खोटे यांच्याकडे पाहिल्यानंतर लक्षात येतं सामाजिक क्षेत्रात चळवळ करत असताना स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात शिपाई म्हणून काम करताना मनात संकल्पना आली आणि विद्यालय स्थापन केलं फक्त एवढंच म्हटलं तर विषय संपेल पण त्यांनी केलेला संघर्ष त्यांच्यातील जिद्द चिकाटी त्यातून उभा राहिलेलं आर्यन टी विद्यालय हे आज नावारूपाला आला आहे. विद्यालयातून अनेक विद्यार्थी घडले मोठ्या पदावर गेले विद्यालयाचे नाव मोठं होत गेलं आज विद्यालय पाटोदा तालुक्यात नावा रुपाला आल आहे त्याला एकमेव कारण ठरलं ते म्हणजेच संजय खोटे यांची जिद्द–चिकाटी आणि संघर्ष खरच त्यांच कौतुक करायलाच हवं.

### सागर धस यांच्याकडून वीर सरांच्या कार्याचे कौतुक!

स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुगगाव चे सेवानिवृत्त शिक्षक लालासाहेब गोपाळराव वीर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमांमध्ये बोलताना सागर धस यांनी त्यांच्या तीस वर्षाच्या कार्यकाळाचा लेखाजोखा मांडला आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केलं भविष्यामध्ये त्यांनी आता स्वतःचं आयुष्य जगावं असं ही त्यांनी या ठिकाणी नमूद केले.

### सेवापूर्ती कार्यक्रम

स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगांव चे लालासाहेब गोपाळराव वीर सर यांची सेवापूर्ती पूर्ण झाल्याने त्यांचा कार्यक्रम जिजाऊ जयंती निमित्त आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांनी केलेल्या तीस वर्षाच्या सेवेवर प्रकाश टाकताना मान्यवरांनी त्यांच्या कामाचं कौतुक केलं.

## अन्याय,अत्याचाराचा प्रतिकार ही तरुणाईची ओळख –कवी डॉ.राजपंखे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तरुणांनी कोणाचीही गुलामी न पत्करता शिक्षण घेऊन, शिक्षित होवून अन्याय अत्याचाराचा प्रतिकार केला पाहिजे हीच तरुणाईची खरी ओळख होय असे प्रतिपादन प्रसिद्ध गझलकार डॉ . मुकुंद राजपंखे यांनी केले. येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख



पाहुणे म्हणून कवी मुकूंद राजपंखे यांनी कांहीं गझल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले . चांगले शिक्षण घेतले, चांगले वाचन केले तर आपल्या जीवनाला दिशा मिळू शकते.वाचाल तर वाचाल हा मूलमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला . आपल्या गझलेतून विद्यार्थ्यांना वास्तवतेची जाणिव करुन दिली चांगल्या मार्गाचा अवलंब करून जीवन यशस्वी ◀◀ पान ३ वर





बीड : पौष पौर्णिमेनिमित्त कोष्टी समाजाच्या वतीने बीड शहरामध्ये चौंडेश्वरी देवीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये समाजातील प्रतिष्ठित, महिला, मुले, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



माजलगाव:– केज येथे बीड लोकसभेचे लोकप्रिय खासदार मा.बजरंग (बप्पा) सोनवणे यांची दि १३ जानेवारी सोमवार रोजी भेट घेऊन यथोचित सत्कार करताना माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे,पत्रकार वाजेद पठाण, शेकापचे नेते ऑड नारायण गोले पाटील राजाराम जमजाळ

# जबरी चोरीचा गुन्हा : गुन्हेगाराच्या सहा तासात आवळल्या मुसक्या

## अंभोरा पोलीस ठाण्याचे सिंघमरित्या कामगिरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत दि. १२.०१.२०२५ रोजी मध्यरात्री ०१.०० ते ०२.०० वा चे सुमारास मौजे हिवरा येथे फिर्यादी नामे बापु मच्छिंद्र लगड रा. हिवरा ता. आष्टी जि.बीड यांचे रहाते घरी अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी कोंडा तोडुन घरात आत प्रवेश करुन चाकु सारखे हत्याराचा धाक दाखवुन सोन्या, चांदीचे दागीने व रोख रक्कम असा मिळुण एकुण–८४२००/–रु चा मुद्येमाल अज्ञात इसमांनी जबरी चोरी करुन घेवुन गेले बाबत पोलीस स्टेशन अंभोरा येथे गुरन–२५/२०२५ कलम– ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल असुन नमुद गुन्हयाचा तपास प्रभारी अधिकारी श्री. मंगेश



साळवे हे करीत आहेत. गुन्हा दाखल होताच तात्काळ मा. पोलीस अधिक्षक श्री. नवनित काँवत साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बाळकृष्ण हनपुडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. मंगेश साळवे, पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, लुईस पवार, बाबुराव तांदळे, पोलीस अंमलदार–शिवदास केदार, अमोल सिरसाट, सुदाम पोकळे, सतिष पैठणे यांनी गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या सहा तासामध्ये गुन्हयातील तीन आरोपींना ताब्यात घेतले असुन आरोपींना विश्वासात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी पोलीस स्टेशन अंभोरा येथे १) गुरन–५७/२०२४ कलम–३८०,३४ भादवि २) गुरन–७६/२०२४ कलम–४५४,४५७,३४ भादवि ३) गुरन–१५७/२०२४ कलम–३८०,३४ भादवि ४) गुरन– ◀◀ पान ३ वर

## राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त रक्तदान

उमापूर । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी येथे युवा भारत समुहाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त गेल्या दहा वर्षापासून रक्तदान शिबीर व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाची परंपरा कायम सुरू आहे. सालाबादाप्रमाणे याहीवर्षी दि. १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक सुभाष काळे, उपक्रमशील




### दहा वर्षापासुनची अविरत परंपरा : युवा भारत समुहाचा पौळाचीवाडी येथे संवाद मेळावा

शेतकरी विकास पठाडे, धाराशिव, संघर्ष धान्य बँकेचे अध्यक्ष शिवाजी झेंडेकर,सय्यद जावेद, हिवरे बाजार, तुकाराम तळतकर, मुख्याध्यापक सय्यद उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी व परिसरातील युवक हे गेल्या दहा वर्षांपासून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन ◀◀ पान ३ वर

## पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅलीचे आयोजन

मुंबई । प्रतिनिधी

१ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी जिल्ह्यातील सेलू येथे आदर्श तालुका आणि जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा संपन्न होत आहे.. या मेळाव्याच्या निमित्तानं पुणे ते सेलू अशी पत्रकार एकता रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती एस. एम देशमुख यांनी दिली..



३१ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता पुणे येथून रॅलीला सुरूवात होईल.. रॅली शिक्रापूर, शिरूर, नगर, जामखेड, कडा, आष्टी, पाटोदा फाटा, बीड, वडवणी, तेलगाव, माजलगाव, पाथरी मार्गे रात्री ८ वाजेपर्यंत सेलू येथे पोहोचेल.. पुणे ते सेलू हे अंतर अंदाजे ३५० किलो मिटर एवढे आहे.. पुणे येथून रॅली निघाल्यानंतर मार्गावरील तालुका संघांनी गावातील प्रमुख व्यक्ती सह रॅलीचे स्वागत करावे अशी अपेक्षा आहे.. तसेच मार्गावरील पत्रकार संघांनी ◀◀ पान ३ वर

## क्रीडा स्पर्धेमध्ये विवेकवर्धिनी गुरुकुलचे यश

बीड । प्रतिनिधी

येथील महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषद आयोजित क्रीडा महोत्सव २०२५ यामध्ये संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुलाच्या मुलांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

यामध्ये संघटनेच्या माध्यमातून बीड जिल्हा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यामध्ये माध्यमिक गटातून विवेकवर्धिनी गुरुकुलाचा संघ द्वितीय क्रमांकाने विजयी झाला . यामध्ये बेस्ट बॉलर म्हणून रोहित जगताप याची निवड करण्यात आली.या संघांमध्ये खेळाडू कर्णधार रोहित जगताप विशाल बोरसे योगेश पवार करण हाके अतुल सावंत सुरज गाडे मयूर




कोल्हे कृष्णा करांडे शुभम कोरडे पृथ्वीराज कदम बळीराम शिंदे प्रणव शिनगारे रोहन पवार यांचा समावेश होता. प्रशिक्षक म्हणून दशरथ बागलाने सर श्री .राम हळणार सर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली .तसेच योगा स्पर्धेमध्ये भांगे देवांश याचा १४ वर्षीय वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक आला .सन व सणावळी या स्पर्धेमध्ये राजवर्धन मात्रे याचा द्वितीय क्रमांक आला. संघाच्या या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर मुख्याध्यापिका सौ . अर्चनाताई जानोळे सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी पालकांनी अभिनंदन केले आहे .

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील उच्चशिक्षित तरुणाची फसवणूक; तब्बल ८० लाखांना घातला गंडा

**पिंपरी । प्रतिनिधी**

क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून दर महिन्याला दहा टक्के परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने पिंपरी- चिंचवड मधील उच्चशिक्षित तरुणाची ८० लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड सायबर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. अविनाश सिंग आणि रवी ठाकूर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोघेही मार्केटिंग आणि साखळी पद्धतीने उच्चशिक्षित तरुणांना त्यांच्या जाळ्यात ओढत होते. याबाबत सेमिनार घेऊन त्यांना कशा पद्धतीने परतावा मिळू शकतो. याबद्दल ते पटवून द्यायचे.



सायबर गुन्हेगारी मध्ये अनेक उच्चशिक्षित तरुण अडकत असल्याचं वारंवार समोर येत आहे. पिंपरी- चिंचवड शहरातील उच्चशिक्षित असलेल्या तरुणाला क्रिप्टो करन्सीच्या माध्यमातून ८० लाख रुपयांना गंडा घातला आहे. आरोपी अविनाश सिंग आणि रवी ठाकूर हे ओरीस कॉइन कंपनीच्या माध्यमातून विविध उच्चशिक्षित तरुणांना आपल्या जाळ्यात ओढत, क्रिप्टोकरन्सीची कंपनी असल्याचं ते भासवायचे. दर महिन्याला दहा टक्के परतावा मिळवण्याच्या आमिषाने त्यांना पैसे गुंतवण्यास भाग पाडायचे. काही जणांना त्यांनी ते पैसे दिले. परंतु, फिर्यादी यांनी तब्बल ८० लाख रुपये त्यांच्याकडे गुंतवले होते. त्यांना तो परतावा मिळाला नाही. त्यानंतर त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचं समोर आलं. या प्रकरणानंतर फिर्यादी यांनी पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांकडे धाव घेऊन याबाबत रीतसर तक्रार नोंदवली.

महिन्याला हप्ता दे नाहीतर, मी; पुण्यात गुंडाकडून व्यावसायिकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण

कंपनीच्या मालकांचा शोध

सायबर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान याप्रकरणी अशी फसवणूक इतर कोणाची झाली असल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असं आवाहन देखील सायबर पोलिसांकडून करण्यात आलं आहे. या प्रकरणांमध्ये ओरिस कॉइन कंपनीचे मालक राहुल खुराना आणि तरुण त्रिका या दोघांचा सायबर पोलीस शोध घेत आहेत.

## भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या भाग विकास निधीतून ५० लाख रुपयांचा निधी देणार-दिलीप वळसे पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र थापलिंग गडावरील नियोजित खंडोबा मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या भाग विकास निधीतून ५० लाख रुपयांचा निधी देणार असल्याची माहिती माजी सहकार मंत्री व आमदार दिलीप वळसे पाटील यांनी सोमवार(ता.१३)रोजी दिली.



पौष पौर्णिमेनिमित्त श्रीक्षेत्र थापलिंग गडावर यात्रेनिमित्त माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी सोमवारी गडावर येऊन खंडोबा देवाचे दर्शन घेऊन तळी भंडार केला,यावेळी त्यांनी नवसाचे बैलगाडे पाहण्याचा आनंद घेतला.यावेळी विष्णू हिंगे, विवेक वळसे पाटील,संजय गवारी,प्रकाश घोलप,दत्ताशेठ थोरात, अशोक आदक,सुहास बाणखेले,रमेश खिलारी,सचिन पानसरे, शिवाजीराव लोंढे,वैभव उंडे आदी मान्यवर उपस्थित होते. यात्रेकरूंना शुभेच्छा देताना आमदार दिलीप वळसे पाटील म्हणाले थापलिंग खंडोबा हे आपले श्रद्धास्थान आहे.मी आठवी-नववीत असल्यापासून दरवर्षी थापलिंगच्या यात्रेला येऊन खंडोबा देवाचे दर्शन घेतो.आमदार,मंत्री म्हणून काम करत असताना आपण शासकीय निधीतून थापलिंग गडावरील विविध विकास कामांसाठी निधी मंजूर करून आणला.आता मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू झाले आहे.या कामासाठी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या भाग विकास निधीतून ५० लाख रुपयांचा निधी देणार असल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले. ज्यावेळी बैलगाडा शर्यतीवर बंदी आली.त्यावेळी आपण शासनाच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयापर्यंत पाठपुरावा करून शर्यतीवरील बंदी उठवली त्यामुळे आज बैलगाड्यांचा आनंद घेता येत आहे.थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या पुढाकाराने यात्रेचे चांगले नियोजन केले जात आहे. यावेळी थापलिंग देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष देवदत्त निकम व सचिव डी. एन .पवार यांच्या हस्ते दिलीप वळसे पाटील यांचा सत्कार करण्यात आला.सूत्रसंचालन सरपंच गणेश यादव,उपसरपंच सुनील शिंदे यांनी केले.

## अंजनगाव उपकेंद्रामुळे पुरेशा दाबाने वीज-उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती । प्रतिनिधी**

तालुक्यातील अंजनगाव येथे नव्याने उभारलेल्या महावितरणच्या ३३/११ केव्ही वीज उपकेंद्राचा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि. ११) शुभारंभ झाला. या उपकेंद्रामुळे अंजनगाव पंचक्रोशीतील सुमारे तीन हजार वीज ग्राहकांना पुरेशा दाबाने व सुरळीत वीजपुरवठा मिळणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.



अंजनगाव (कर्हावागज) उपकेंद्र होण्यापूर्वी या परिसरातील गावांना व शेतीपंपांना बारामती शहरातील १३२/२२ केव्ही अतिउच्चदाब वीज उपकेंद्रातून वीजपुरवठा केला जात होता, परंतु या वीज वाहिनीची लांबी जास्त असल्यामुळे वीजपुरवठा कमी दाबाने व विस्कळीत होत असे. उपमुख्यमंत्री पवार यांच्या पाठपुराव्यामुळे सुमारे ७ कोटी ८५ लाख रुपये निधीतून अंजनगाव येथे वीज उपकेंद्राची उभारणी झाली. या नवीन उपकेंद्रामध्ये ५ एमव्हीए क्षमतेचे २ अतिउच्चदाब रोहित्र आहेत. या उपकेंद्रातून अंजनगाव व कर्हावागज अशा दोन गावठाण वाहिन्या तर अंजनगाव व कर्हावागज दोन शेती वाहिन्या निघतात. ज्यापुढे जाऊन अंजनगाव, रानमळा, कुचेकरवस्ती, कर्हावागज शिवार, बनकरवस्ती, नेपतवळण, तांदळेवस्ती, नाळेवस्ती, खोमणेवस्ती, लष्करवस्ती या भागातील शेती व बिगरशेती ग्राहकांना पुरेशा दाबाने व अखंडित वीजपुरवठा करणार आहेत.या उपकेंद्रावर शेतीपंपाचे १६०० तर गावठाणचे १३०० वीजग्राहक येतात. २०२२ मध्ये कृषी आकस्मिक निधीतून ( अउऋ) मंजूर झालेल्या अंजनगाव वीज उपकेंद्र उभारणीचे काम मे. एसीडीसी साईदीप बिल्डकॉन प्रा.लि. यांनी केले आहे. याप्रसंगी खासदार सुप्रिया सुळे, सरपंच प्रतिभा परकाळे, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधिक्षक अभियंता दीपक लहामगे, कार्यकारी अभियंता संजय सोनवलकर, म्हसू मिसाळ व प्रमोद रागीट, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश देवकाते व विठ्ठल बडे, उपकार्यकारी अभियंता मोहन सूळ यांचेसह पंचक्रोशीतील नागरिक व अधिकारी वर्गाची उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांमध्ये तुफान हाणामारी, कपडे फाटेपर्यंत बेदम मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

लोणी काळभोर येथील एमआयटी कॉर्नरजवळ विद्यार्थ्यांच्या टोळक्याकडून तिघांना दगडासह लाठी काठीने कपडे फाटेपर्यंत बेदम मारहाण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या टोळक्याने तिघांना दगडासह लाठी काठीने कपडे फाटेपर्यंत बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना एमआयटी कॉर्नर परिसरात असलेल्या ईस्ट हेवन सोसायटीजवळ सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. या मारहाणीचा सीसीटीव्ही व्हायरल होत आहे. वारंवार होणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांमुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे.





मारहाण करणारे विद्यार्थी हे लोणी काळभोरच्या चखढ महाविद्यालयातील असल्याची माहिती आहे. महाविद्यालयाच्या खानावळीत विद्यार्थ्यांच्या दोन गटात जोरदार राडा झाला. त्यानंतर हा वाद रस्त्यावर आला आणि रस्त्यावरच या विद्यार्थ्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीच्या वेळी एक दगड त्या ठिकाणी आलेल्या वृद्धालाही लागल्याची माहिती आहे. या प्रकरणाचा सीसीटीव्ही समोर आला आहे. सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी हाणामारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ताब्यात घेतलं आणि समज देऊन सोडल्याची माहिती आहे. जर या विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंद झाला असता तर त्यांच्या करिअरवर परिणाम झाला असता. त्यामुळे पोलिसांनी केवळ समज देऊन त्यांना सोडल्याची माहिती आहे.

विद्यार्थ्यांच्या हाणामारीच्या घटनेत सातत्याने वाढ लोणी काळभोर जवळ शैक्षणिक संकुल आहे. या संकुलात हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. काही विद्यार्थी संकुलाच्या वसतीगृहात राहतात. तर काही विद्यार्थी एमआयटीने संकुलाच्या बाहेरच्या परिसरात भाडेतत्वावरील घेतलेल्या वसतीगृहात राहतात. बरेच विद्यार्थी स्वत: फ्लॅट घेऊन मित्रांसोबत भाडेतत्वावर राहतात. त्यामुळे या परिसरात वादाच्या घटना नेहमीच होत असल्याची माहिती आहे. पण गेल्या काही दिवसांपासून मारामारीच्या या घटनांची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याचं दिसून येतंय.

## टिळक रस्त्यावर भरधाव कार घुसली थेट दुकानात

**पुणे । प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात प्रकाणानंतर पुणे शहरातील नाईट लाईफ देशभर चर्चेला आली होती. तसाच काहीसा अपघात रविवारी पहाटे टिळक रस्त्यावर घडला. सुदैवाने त्या क्षणी रस्त्यावर कोणतेही वाहन आणि पादचारी नव्हते, अन्यथा मोठा अनर्थ झाला असता. मात्र अपघातग्रस्त कार रस्याच्या कडेला असलेल्या इलेक्ट्रॉनिक्सच्या शोरुमला धडकली. यामुळे शोरुम मालकाचे मात्र २० ते २२ लाखाचे नुकसान झाले आहे. येथून हाकेच्या अंतरावरच मॅरेथॉनसाठी हजारो लोक जमले होते.



याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्सचे मालक मनमितसिंग हरबनसिंग छावरा (४७,रा. सॅलीसबरी पार्क) यांनी तक्रार दिली आहे. शिवपुत्र कमलाकर वेळ ( १९,रा. सत्यराज अंगण, काळेपडळ ) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याच्या सोबत त्याचे तीन मित्रही कारमध्ये होते. शिवपुत्र याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्सचे मालक मनमितसिंग हरबनसिंग छावरा (४७,रा. सॅलीसबरी पार्क) यांनी तक्रार दिली आहे. शिवपुत्र कमलाकर वेळ( १९,रा. सत्यराज अंगण, काळेपडळ ) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याच्या सोबत त्याचे तीन मित्रही कारमध्ये होते. शिवपुत्र याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही.

## लष्करात अधिकारी असल्याच्या बहाण्याने पाच लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

लष्करात अधिकारी असल्याच्या बहाण्याने सायबर चोरट्याने कोथरूडमधील ज्येष्ठ नागरिकाची पाच लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी सायबर चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



याबाबत एका ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सायबर चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कोथरूडमधील पौड रस्ता परिसरात गुरूराजनगर सोसायटीत राहतात. चोरट्याने ३१ डिसेंबर रोजी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्याने लष्करात अधिकारी असल्याचे सांगून विश्वास संपादन केला. सदनिका भाडेतत्त्वावर घेण्यासाठी अनामत रक्कम पाठवितो, असे सांगून ज्येष्ठाच्या बँक खात्याची माहिती घेतली. त्यानंतर चोरट्याने ज्येष्ठाच्या बँक खात्यातून आरटीजीएसद्वारे पाच लाख ३५ हजार रुपये काढून घेतले. ही बाब लक्षात आल्यानंतर ज्येष्ठाने १२ जानेवारी रोजी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास वरिष्ठ निरीक्षक संदीप देशमाने करीत आहेत.

## जेजुरीत गाढवांच्या बाजारात लाखो रुपयांची उलाढाल

**जेजुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणार्या श्री खंडोबा देवाच्या जेजुरीनगरीत पौष पौर्णिमेनिमित्त भरलेल्या गाढवांच्या बाजारात लाखो रुपयांची उलाढाल झाली. या बाजारात गाढवांना २५ हजारांपासून एक लाखापर्यंत भाव मिळाला.



जेजुरी येथील गाढवांच्या बाजारात गुजरात व महाराष्ट्राच्या विविध भागांतून पाचशेहून अधिक गाढवं विक्रीसाठी दाखल झाली आहेत. गुजरातमधून आणल्या काठेवाडी गाढवांना ५० हजार रुपयांपासून एक लाख रुपयापर्यंत भाव मिळत आहे. गावठी गाढवांना २५ हजारांपासून ते ५० हजार रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. या बाजारात यंदा गाढवांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे गाढवांना चांगला भाव मिळत आहे. गाढवाचे दात, वय पाहून त्याची किंमत ठरविली जाते. दोन दातांच्या गाढवांना दुवान, चार दातांच्या गाढवांना चौवान, कोरा, अखंड, जवान असे म्हटले जाते. अखंड दात असलेल्या गाढवाला चांगली किंमत मिळत आहे. पौष पौर्णिमेला जेजुरी येथील यात्रेसाठी राज्यभरातून भाविक येत आहेत. तसेच, गाढवावर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या कोल्हाटी, वैदू, बेलदार, कुंभार, गाडीवडार, मातीवडार, कैकाडी, मदारी, गारुडी, घिसाडी, माकडवाले या भटक्या जमातींतील हजारो भाविक या यात्रेत सहभागी झाले आहेत. कुलदैवत खंडोबा देवाच्या दर्शनाबरोबरच गाढवांची खरेदी-विक्री करून भाविक या पारंपरिक यात्रेचा आनंद घेत आहेत.

## दिव्यांग स्टॉलधारकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार-काशिनाथ नखाते

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील पथारी, स्टॉल धारकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यांना परवाना देण्यासाठी फॉर्म भरून घेतले आहेत. तरीदेखील महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून पथारीधारकांवर होणारा त्रास अन्यायकारक आहे. यामध्ये काही स्टॉलधारक दिव्यांग आहेत. अशा दिव्यांग स्टॉलधारकांचे प्रश्न प्राधान्यक्रमाणे सोडवणार, असे आश्वासन कष्टकरी व फेरीवाला क्रांती महासंघाचे अध्यक्ष कामगार नेते काशिनाथ नखाते यांनी दिले.



भोसरीमधील महासैनिक औद्योगिक वसाहत येथे आयोजित अपंग (दिव्यांग)सहारा संस्थेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन स्थायी समितीचे माजी अध्यक्षअजित गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उडान दिव्यांग फाउंडेशनचे आनंद बनसोडे,अल्टीग्रीन ऑटोमोबाईल कंपनीचे वैभव पाटील, अपंग (दिव्यांग)सहारा संस्थेचे अध्यक्ष अशोक सोनावणे, किरण साडेकर, रणरागिणी महिला लघु उद्योग सोशल फाउंडेशनच्या सरोन कुचेकर, उपाध्यक्ष गणेश तेली, खजिनदार संजीवनी सिरसाट,सचिव नानासाहेब डाडर यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

यावेळी अजित गव्हाणे म्हणाले की, दिव्यांग बांधव कोणत्याही स्वरूपामध्ये आलेल्या दिव्यांगत्वावर निराश न होता जिद्दीनं, ताकतीन उभे आहेत त्यांच्या जिद्दीला सलाम करण्याची गरज आहे. दिव्यांगांना कुणाची भीक नको तर संधी देण्याची गरज आहे. या कार्यक्रमात मिनिता पाटील (कला), नंदकुमार फुले (प्रशासकीय), प्रकाश मोहारे (क्रीडा), धर्मेंद्र सातव व शिवाजी भेगडे (दिव्यांग कल्याण) यांना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. हरिदास शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘त्या’ खुनाच्या प्रयत्नातील आरोपीला सापळा रचून पकडले; पिस्तुलास दोन काडतुसे जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल असलेल्या सराईताला बेकायदेशिररित्या पिस्तुल बाळगल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून लोखंडी पिस्तूलस दोन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. त्याने हे पिस्तूल कशासाठी वापरले तसेच ते कोणाकडून आणले, याबाबत पोलीस तपास करत आहेत.



सोहम शशिकांत वाघमारे (वय २०, रा. तळजाई वसाहत, सहकारनगर, पुणे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्यावर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक प्रताप मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक आशिष कवठेकर, अमोल रसाळ, उपनिरीक्षक नितीन कांबळे, अमंलदार शंकर नेवसे, अमोल सरडे, गणेश थोरात, एमकार कुंभार, हनुमंत कांबळे, निखील जाधव, राहुल शिंदे, नागनाथ राख यांच्या पथकाने ही केली आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी गुन्हे शाखा हद्दीत गस्त घालत आहे. सराईतांवर लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, पेट्रोलिंग करत असताना पथकाला माहिती मिळाली की, सहकारनगर पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल असलेला आरोपी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मस्तान हॉटेल जवळ कात्रज रोड परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून त्याला बेड्या ठोकल्या. झडती घेतली असता त्याच्याकूडन एक पिस्तूल व काडतूसे जप्त करण्यात आले आहेत. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्याकडून अधिक चौकशी केली आहे.